महासागर

नागपूर वृत्तसागर

बुधवार, दि. १८, जून २०२५


## सेकंड फ्लोअर कॅफेतील हुक्का पार्लरवर धाड

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**

गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने सीताबर्डी ठाण्यांतर्गत गस्ती दरम्यान मिळालेल्या माहितीवरून लक्ष्मी भवन चौकातील सेकंड फ्लोअर कॅफेतील हुक्का पार्लरवर धाड टाकली. यावेळी तेथे ग्राहक हुक्क्याचे सेवन करताना आढळले. पोलिसांनी कॅफे संचालकासह चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

सनी विकास बोरकर (25), ब्रिनाल सुधीर गवरे (20) दोन्ही रा. आंबेडकरनगर, धरमपेठ, हर्ष सुरेश खंडारकर (22) रा. रामनगर, हिलटॉप आणि अर्पण रवी जामगडे (19) रा. सुदामनगरी अशी आरोपींची नावे आहेत. रात्री 1 ते 3.30 दरम्यान युनिट 5 चे पथक सीताबर्डी ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान लक्ष्मी भवन चौकात गोतमारे कॉम्प्लेक्समधील सेकंड फ्लोअर कॅफेत हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी कॅफेत धाड टाकली असता तेथे ग्राहक हुक्क्याचे सेवन करताना आढळले. आरोपींकडून स्वतःच्या आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना विविध फ्लेव्हरचा तंबाखूजन्य हुक्का उपलब्ध केला जात होता.

पोलिसांना पाहताच ग्राहकांमध्ये पळापळ सुरू झाली. पोलिसांनी कॅफेतून हुक्का पॉट, पाईप, तंबाखूजन्य फ्लेव्हर, रोकड आणि इतर साहित्यांसह एकूण 3 लाख 83 हजार रुपयांचा माल जप्त केला. वरील चारही आरोपींविरुद्ध सीताबर्डी ठाण्यात कोटपा अॅक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोनि संदीप बुवा आणि त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास सीताबर्डी पोलिस करीत आहेत.

## बॉम्ब धमकी ठरली अफवा




# इंडिगोच्या विमानाचे नागपूर विमानतळावर आपात्कालीन लँडिंग

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**

कोचीन येथून दिल्लीकडे जाणाऱ्या इंडिगो एअरलाईन्सचे 6ए-2706 हे विमान आज सकाळी नागपूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षित उतरविण्यात आले. कोचीन येथील एअर ट्रॅफिक कंट्रोल विभागाला बॉम्ब धमकीचा संदेश प्राप्त झाल्यानंतर तत्काळ हे विमान नागपूर विमानतळावर वळविण्यात आले. सकाळी 11:23 वाजता नागपूर येथे ते सुरक्षितपणे उतरले. या विमानात 157 प्रवासी आणि 06 क्रू सदस्य प्रवास करत होते.

नागपूर येथे विमानाच्या लँडिंगअगोदर सुरक्षा यंत्रणेने चोख बंदोबस्त करुन विमान व सर्व साहित्याची तपासणी केली. प्रवाशांना तत्काळ सुरक्षितरीत्या बाहेर काढण्यात आले. केंद्रीय औद्योगिक सुरक्षाबल अंतर्गत एअरपोर्ट सुरक्षा बल, विमानतळ बॉम्ब शोध पथक व नागपूर शहर पोलिसांचे बॉम्ब शोध पथकाने इंडिगो विमानाची आणि प्रवाशांच्या सामानाची सखोल तपासणी केली.

या तपासणीत कोणतेही स्फोटक उपकरण किंवा साहित्य आढळले नाही. या घटनेदरम्यान कोणतीही जीवितहानी, मालमत्ता अथवा विमानतळाशी संबंधित नुकसान झालेले नाही. सुरक्षा तपासणीनंतर विमानाला पुढील उड्डानासाठी परवानगी देण्यात आली. सर्व 157 प्रवासी आणि 06 क्रू सदस्यांना पुन्हा विमानात बसवून विमान दुपारी 03:10 वाजता नागपूरहून रवाना झाले. इंडिगो एअरलाईन्स आणि अन्य संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून सर्व सुरक्षा प्रक्रिया काटेकोरपणे राबवण्यात आल्या. मिहान इंडिया लिमिटेड, केंद्रीय औद्योगिक सुरक्षाबल अंतर्गत एअरपोर्ट सुरक्षा बल, विमानतळ बॉम्ब शोध पथक व नागपूर शहर पोलिसांचे बॉम्ब शोध पथक, एस आय बी, इंडिगो एअरलाईन्स, सोनगाव पोलीस ठाणे आदी यंत्रणांनी उत्तम समन्वय साधून कारवाई पार पाडली.

## वाडीत दिवसाढवळ्या ४.३६ लाखांची लुट

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**

दुचाकीस्वार तीन आरोपींनी बँकेत पैसे जमा करण्यासाठी जात असलेल्या कर्मचाऱ्याची बॅग हिसकावली आणि फरार झाले. बॅगमध्ये 4 लाख 36 हजारांची रोकड होती. ही घटना वाडी पोलिस ठाण्यांतर्गत मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली. पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला आणि केवळ 4 तासांत दोन आरोपींना अटक केली, तर त्यांच्या अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेतले. आर्यन हरीश वाल्दे (18) आणि अंकित सिद्धार्थ वैद्य (20) दोन्ही रा. चंद्रमणी चौक, आंबेडकरनगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

फियार्दी वेदप्रकाश लाजपतप्रसाद शुक्ला (31) रा. शिवशंभूनगर हे सोहम फुड कार्पोरेशनमध्ये काम करतात. मंगळवारी दुपारी त्यांना कंपनीत गोळा झालेली 4.36 लाखांची रोकड बँकेत जमा करण्यासाठी सांगण्यात आले. जवळपास 1.30 वाजताच्या सुमारास शुक्ला त्यांच्या एमएच-49/बीडी-2860 क्रमांकाच्या दुचाकी वाहनाने पैसे जमा करण्यासाठी एचडीएफसी बँकेच्या वाडी शाखेत जात होते. आंबेडकरनगर स्मशानभूमीजवळील कच्च्या रस्त्यावर तिन्ही आरोपींनी त्यांचा अडविले. चाकूचा धाक दाखवून त्यांच्याजवळील बॅग हिसकली आणि फरार झाले. शुक्ला यांनी घटनेची माहिती कंपनी आणि पोलिसांना दिली. वाडीचे ठाणेदार राजेश तटकरे पथकासह घटनास्थळी पोहोचले. पोलिसांना शेजारच्या नाल्याजवळ एक चप्पल दिसली. यावरून आरोपी कोणत्या दिशेने पळाले याचा सुगावा लागला. पोलिसांनी खबऱ्यांना कामावर लावले. या घटनेत आर्यन वाल्देचा हात असल्याची सूचना मिळाली. पोलिसांनी तत्काळ त्याच्या मोबाईलचे लोकेशन शोधले. आरोपी लोकमान्यनगर परिसरातील हॉटेल मूनलाईटमध्ये असल्याचे समजले. तत्काळ सपोनि कुणाल धुरट, पोहवा प्रमोद गिरी, प्रविण फळके, हेमराज बेराल, प्रमोद सोनोने, सतीश यसनकर आणि स्वप्निल करंडे यांचे पथक हॉटेलमध्ये पोहोचले.

## ग्रंथालय भारतीचे रविंद्र पांडे यांची ग्रंथ निवड समितीवर नियुक्ती

**■महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**

ग्रंथालय भारतीचे केंद्रीय कार्याध्यक्ष रविंद्र गोविंद पांडे यांची महाराष्ट्र शासनाने ग्रंथ निवड समितीवर शासन नियुक्त प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती ३ वषार्साठी असून पहिल्या बैठकीपासून कार्यकाल ३ वर्षांचा असेल.

रविंद्र पांडे यांचा गेल्या वीस वर्षांपासून ग्रंथालय चळवळीत सक्रीय सहभाग आहे.तसेच यापूर्वीही महाराष्ट्र शासनाने गठीत केलेल्या ग्रंथालय कायदा सुधारणा समितीमध्ये शासन सदस्य म्हणून काम केले आहे.

रविंद्र पांडे हे स्वतः लेखन करीत असतात.त्यांचे विविध विषयांवरील लेख विविध वर्तमानपत्रात मासिकात पाक्षिकात साप्ताहिक मध्ये प्रकाशित झाले आहेत.

ग्रंथालय भारती, वाचक चळवळ व मित्रपरिवार यांनी अभिनंदन केले असून त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## महावितरणच्या वर्धापनदिनाला विद्युत सुरक्षा अभियानाची जोड

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**

विद्युत सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत महावितरणने यंदा 20 व्या वर्धापन दिनानिमित्त प्रकाशमान महाराष्ट्र, सुरक्षित महाराष्ट्र या विद्युत सुरक्षा अभियानाला सुरवात केली. त्यानिमित्त आयोजित सप्ताहामध्ये सुरक्षा दूत म्हणून तब्बल 1 लाख 97 हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या सूचनेनुसार महावितरणच्या 20 व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून लोकाभिमुख विद्युत सुरक्षा अभियान सुरू करण्यात आले आहे.

विद्युत सुरक्षा अभियानातील सुरक्षा सप्ताहाचा नुकताच समारोप झाला. यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, संचालक अनुदीप दिघे (वित्त), सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांच्यासह मुख्यालयातील अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्युत सुरक्षेची प्रतिज्ञा घेतली.

विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यासाठी 16 परिमंडलांमध्ये मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. मानव संसाधन विभागाचे संचालक राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक परेश भागवत यांच्यासह 11 हजार 323 अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. तसेच महावितरणच्या वेबसाईट व मोबाईल ॲपद्वारे शालेय विद्यार्थी, नागरिक व कर्मचाऱ्यांसाठी ऑनलाइन प्रश्नमंजूषा घेण्यात आली.



घरगुती व सार्वजनिक विद्युत सुरक्षेच्या ऑनलाइन प्रश्नमंजूषेत तब्बल 95 हजार 292 जणांनी प्रतिसाद दिला. यात तब्बल 10 हजार 827 शालेय विद्यार्थी तसेच 84 हजार 466 नागरिक व महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. या सर्वांना ऑनलाइन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

यासह राज्यभरातील 146 विभाग कार्यालय अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यास 7 हजार 857 शालेय विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला व विद्युत सुरक्षेच्या संदेशांचे रंगबिरंगी चित्र रेखाटले. विजेत्यांना बक्षिसे व सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले. विद्युत सुरक्षेच्या जागरासाठी बाईक रॅली, प्रभात फेरी तसेच बसस्थानके, रेल्वे स्टेशन, बाजारपेठा, गदीर्चे ठिकाणे व रहिवासी सोसायट्यांमध्ये महावितरणच्या 59 हजारांवर अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लाखो नागरिकांशी थेट संवाद साधला व विद्युत सुरक्षेची माहिती दिली. अनेक ठिकाणी पथनाट्ये व माहिती पत्रकांद्वारे विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यात आला.

राज्यातील महावितरणच्या 1 कोटी 92 लाख 79 हजार ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएसद्वारे विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यात आला तर 35 लाख 73 हजारांवर ग्राहकांना नोंदणीकृत इमेलद्वारे विद्युत सुरक्षेबाबत काय करावे व काय करू नये याबाबत माहिती देण्यात आली. दि. 5 जूनला पर्यावरण दिनानिमित्त वीजबचतीचा राज्यभरात संदेश देण्यात आला.

## कारमधून गुटखा-तंबाखूची तस्करी

**■महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७**

गुन्हे शाखेच्या वाहन चोरी विरोधी पथकाने गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीवरून सापळा रचत दोन चारचाकी वाहन अडविले. झडतीमध्ये दोन्ही वाहनांमधून गुटखा आणि तंबाखूची तस्करी केली जात असल्याचे समोर आले. पोलिसांनी गुन्हा नोंदवून एका आरोपीला अटक केली. आरोपीकडून गुटखा-तंबाखू आणि कारसह एकूण 12.22 लाख रुपये किंमतीचा माल जप्त करण्यात आला. महेश विठ्ठल उमरेडकर (32) रा. जुनी मंगळवारी, गंगाबाई घाट रोड असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याचा सोनू नावाचा साथीदार फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

गुन्हे शाखेचे वाहन चोरी विरोधी पथक सकाळी 5 वाजताच्या सुमारास नंदनवन ठाण्यांतर्गत वर्धमाननगर परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान दोन चारचाकी वाहनातून मोठ्या प्रमाणात गुटखा-तंबाखूची तस्करी होत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी डे-टू-डे हॉटेलसमोर सापळा रचला. मिळालेल्या माहितीनुसार, एमएच-40/बीबी-2126 आणि एमएच-46/पी-2457 क्रमांकाच्या कार अडविण्यात आल्या. एका कारमध्ये महेश होता, तर दुसऱ्या कारमध्ये सोनू होता.

पोलिसांना पाहताच सोनूने वाहन तेथेच सोडून पळ काढला. मात्र महेश पोलिसांच्या हाती लागला. पंचासमोर दोन्ही कारची झडती घेतली असता मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या कंपनीचा गुटखा, पान मसाला आणि तंबाखू असा एकूण 2 लाख 22 हजार रुपये किंमतीचा माल मिळाला. पोलिसांनी मालासह दोन्ही वाहन जप्त करून महेशला अटक केली. दोन्ही आरोपींविरुद्ध नंदनवन ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला. पुढील तपास नंदनवन पोलिस करीत आहेत. ही कारवाई पोउपनि अनिल इंगोले व त्यांच्या पथकाने केली.

## ५३५२ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर :** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 5,352 वाहन चालकांवर कारवाई करून 3,52,200 रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये 5 प्रकरणात 6 आरोपींवर कारवाई करून 2,23,400 रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये एक प्रकरणात एक आरोपीवर कारवाई करून 15,311 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली.

## चंद्रपूरचा चोरटा धंतोली पोलिसांच्या जाळ्यात

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**

धंतोली पोलिसांनी ठाण्यांतर्गत विकासनगर परिसरात घरफोडीचा छडा लावत चंद्रपुरातील एका चोरट्याला अटक केली. चौकशीत त्याच्याकडून घरफोडीचे आणखी 4 गुन्हे उघडकीस आले. आशिष श्रीनिवास रेड्डीमल्ला (25) रा. रय्यतवारी कॉलनी, चंद्रपूर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. आशिष हा सराईत गुन्हेगार असून अट्टल घरफोड्या आहे. विकासनगरच्या सम्यक अपार्टमेंटमध्ये राहणारी फिर्यादी शीतल नरेश चित्तलवार (24) ही गत 8 जूनच्या रात्री घराला कुलूप लावून कुटुंबासह काकाच्या घरी चंद्रपूर येथे गेली होती. या दरम्यान अज्ञात आरोपीने त्यांच्या घराचे कुलूप तोडून कपाटातील रोख 22 हजार चोरून नेले. दुसऱ्या दिवशी घरी परतल्यानंतर ही घटना उघडकीस आली आणि त्यांनी धंतोली पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला.

गत आठवडाभरातील ठाण्यांतर्गत घरफोडीची ही 6 वी घटना होती. त्यामुळे पोलिसांनी गंभीरतेने घेते सतत तीन दिवसांपर्यंत वेगवेगळ्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली आणि आशिषचा सुगावा लागला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने केवळ शीतलचेच घरी नाहीतर ठाण्यांतर्गत आणखी दोन ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली.

# नियमित दुरुस्तीसाठी आज वीजपुरवठा खंडित

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**

महावितरणतर्फे उद्या, बुधवार, १८ जून रोजी नागपुरातील कॉंग्रेसनगर, सिव्हील लाईन्स, महाल, गांधीबाग आणि बुटीबोरी विभागांतील विविध भागांमध्ये काही तासांसाठी वीजपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. वीज वाहिन्यांच्या नियमित देखभाल व दुरुस्तीच्या कामांमुळे हा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल महावितरणने दिलगिरी व्यक्त केली आहे.

यामुळे कॉंग्रेसनगर विभागात सकाळी ८ ते १० या वेळेत ११ केव्ही अपना बाजार वीज वाहिनीवरील बीएसएनएल कार्यालय परिसर, टेकडी गणेश, टेकडी लाईन, हवाई दल आणि मच्छी बाजार. सकाळी ८ ते ११ या वेळेत ११ केव्ही हिंदुस्तान कॉलनी वाहिनीवरील प्रशांतनगर,समर्थनगर, चुनाभट्टी, एफसीआय गोडाऊन, जुनी अजनी, अंबिकानगर, जय आणि सिंचन कॉलनी व सभोवतालचा परिसर. ११ केव्ही कचोरे पाटील वाहिनीवरील अण्णाभाऊ साठे नगर, वर्धा रोड, चिचभवन,राय इम्पीरियल आणि ऑर्किड सोसायटी. ११ केव्ही कर्वेनगर वाहिनीवरील कर्वेनगर, उज्ज्वलनगर, सावित्रीनगर, श्रीरामनगर, पावनभूमी आणि कॉमोपॉलिटन. ११ केव्ही एन्सारा वाहिनीवरील एन्सारा सिटी, रचना मिथिला,गगन सिटी, अथर्व नगरी ४ व ७ आणि पिपळा गाव. ११ केव्ही बर्डी वीज वाहीनीवरील बर्डी व सभोवतालच्या परिसर,११ केव्ही आग्रस्त आणि ११ केव्ही मधुमाधव वाहिन्यांवरील परिसर सकाळी ८ ते ११ या वेळेत बंद राहील. सकाळी ८ ते ९ या वेळेत ११ केव्ही सराफ कोर्ट वीज वाहिनीवरील यशवंत स्टेडियम क्षेत्र आणि धंतोली. सकाळी ८:३० ते ११:३० या वेळेत ११ केव्ही टेलीकॉमनगर वीज वाहिनीवरील टेलीकॉमनगर, स्वावलंबीनगर,फ्रेंड्स कॉलनी, रवींद्रनगर, गवांडे लेआउट, पॉईनियर सोसायटी आणि स्वरूपनगर. ११ केव्ही लंडन स्ट्रीट या वीजवाहिनीवरील अग्ने लेआउट, गांधी बिल्डर,सुजाता लेआउट, दिनदयालनगरचा काही भाग आणि देवीप्रभा क्षेत्राचा काही भाग. ११ केव्ही त्रिमुर्तीनगर वाहिनीवरील सुर्वेनगर,एलआयजी व एमआयजी कॉलनी, आदिवासी लेआउट,आझादहिंदनगर, सुमितनगर, अध्यापक लेआउट आणि नेल्को सोसायटी. सकाळी ७:३० ते १०:३० या वेळेत ११ केव्ही गायत्रीनगर वाहिनीवरील गायत्रीनगर, परसोडी, दत्त मंदिर, श्रीनगर आणि हनुमान मंदिर परिसर. सकाळी ९ ते ११ या ११ केव्ही अत्रे लेआऊट वाहिनीवरील धनगरपुरा, सीएफसी सेंटर, शिवनेरी एप्रिल आणि पायल एप्रिल या भागातील वीजपुरवठा बंद राहील.

सिव्हील लाईन्स विभागात सकाळी 8 ते 11 या वेळेत 11 केव्ही आकारनगर वीज वाहिनीवरील आकार नगर, स्वामी कॉलनी फेज-1, स्वामी कॉलनी फेज-2, जगदीश नगर, प्रेरणा नगर, गंगा नगर, केजीएन सोसायटी, वेलकम सोसायटी, अखिल विश्व भारती सोसायटी, वीरचक्र कॉलनी, विघ्नहर्ता कॉलनी, एम.बी. इस्टेट, हिंद प्रेरणानगर, रक्षानगर, विद्यानगर, 11 केव्ही सीएमपीडीआय वीज वाहिनीवरील सीएमपीडीआय कॉलनी, डब्लूसीएल आणि पीएफ कॉलनी, सकाळी 8 ते 10 या वेळेत 11 केव्ही क्लार्क टाऊन 1 वाहिनिवरील साई मंदीर, मेकोसाबाग, सकाळी 8 ते 12 या वेळेत 11 केव्ही नारा वीज वाहिनीवरील कमाल चौक, बाळाभाऊ पेठ, सकाळी 9 ते 12 या वेळेत 11 केव्ही जाफरनगर वाहिनीवरील चौधरी लेआउट, बसेरा अपार्टमेंट, गुलिस्तान कॉलनी, अहबाब कॉलनी, अनंत कॉलनी, एसबीआय कॉलनी, पेन्शन नगर, दुपारी 12 ते 3 या वेळेत 11 केव्ही तेलंगखेडी वाहिनीवरील सीपीडब्ल्यूडी कॉलनी बंगला क्रमांक 17,18 व 19, अॅटोमिक मिनरल रिसर्च विभाग, गजानन महाराज मंदिर, दूध योजना सोसायटी क्वार्टर, सीपीडब्ल्यूडी जुने क्वार्टर या परिसरातील वीज पुरवठा बंद राहील.

महाल विभागात 7 ते 11 या वेळेत 11 केव्ही नरेंद्रनगर वीज वाहिनीवरील मधुबन सोसायटी, नगर विकास सोसायटी, जयदुर्गा नं.1 सोसायटी, पीएमजी सोसायटी, डोबी, संताजी सोसायटी, फ्रेंड्स कॉलनी, नरेंद्र नगर सोसायटी व सभोवतालच्या परिसराचा, 11 केव्ही डायमंडनगर वीज वाहिनीवरील कामगारनगर, सहकारनगर, विजयालक्ष्मी पंडित नगर, ईश्वरनगर या भागातील तर तुळशीबाग वीज वाहिनीवरील रतन कॉलनी, चिटणविसपुरा, गजानन चौक, जुनी शुक्रावरी, भोला गणेश चौक, नाईक रोड या भागातील वीजपुरवठा बंद राहील.

गांधीबाग विभागात 8.30 ते 10.30 या वेळेत 11 केव्ही कावरापेठ वीज वाहिनीवरील डीप्टी सिग्नल परिसर, बाजार चौक, पुजारामवाडी या भागाचा, सकाळी 9 ते 11 या वेळेत 11 केव्ही मिनीमातानगर वाहिनीवरील जानकी नगर, मिनीमाता नगर, पाचझोपडा तर सकाळी 8 ते 12 या वेळेत 11 केव्ही मेहंदीबाग वाहिनीवरील मेहंदीबाग, जामदारवाडी, कांजी हाऊस, कांजी चौक, जोशीपुरा, जयभोळे नगर या भागातील वीजपुरवठा बंद राहील.

# सलग दुसऱ्या दिवशी ९२ सफाई कामगारांवर कारवाई



**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**

नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी मंगळवारी (ता. १७) सफाईचे काम करणाऱ्या कामगारांच्या हजेरीची तपासणी केली. या पाहणीत गांधीबाग झोनमधील प्रभाग क्रमांक १९ मधील चिटणीस पार्क हजेरी स्टँडवर ८२ कामगार तसेच लक्ष्मीनगर झोनमधील प्रभाग क्रमांक ३६ मधील १० सफाई कामगार कोणतीही पूर्वसूचना न देता गैरहजर असल्याचे आढळून आले. कोणतीही पूर्वसूचना न देता गैरहजर राहिलेल्या या दोन्ही झोनमधील एकूण ९२ सफाई कामगारांवर १ हजार रुपयांचा दंड तसेच अर्धा दिवसाच्या वेतन कपातीचे निर्देश अतिरिक्त आयुक्त पंत यांनी झोन अधिकार्यांना दिले.

पावसाळ्यापूर्वी शहराची साफसफाई योग्यरितीने व्हावी, यासाठी महानगरपालिकेचे प्रशासन कामाला लागले असून, अतिरिक्त आयुक्ती वसुमना पंत यांनी शहरातील विविध झोनमध्ये जाऊन सफाई कामगारांच्या उपस्थितीची पाहणी केली. यात गांधीबाग झोनमधील चिटणीस पार्क हजेरी स्टँडवर एकूण कामगारांपैकी ८२ कामगार कोणतीही पूर्वसूचना न देताना गैरहजर आढळून आले. यावेळी स्वच्छता निरीक्षक श्री. रोशन नानेटकर, स्वच्छता जमादार गणेश ग्रावकर उपस्थित होते.

या ८२ सफाई कामगारांवर १ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात यावा तसेच त्यांच्या अर्धा दिवसाचे वेतन कपातीचे निर्देश पंत यांनी अधिकाऱ्यांना दिले. यापुढे कोणतीही पूर्वसूचना न देताना गैरहजर राहू नये, असे ताकीद या कामगारांना देण्यात येणार आहे.

या आकस्मिक भेटीत १२ कामगारांनी रजेचा अर्ज दिल्याचे आढळून आले. या सर्व कामगारांच्या रजा मंजूर करण्यात आल्या किंवा कसे याची शहानिशा करण्याचे निर्देश श्रीमती पंत यांनी अधिकाऱ्यांना दिले.

### लक्ष्मीनगर झोनमध्ये १० कामगार गैरहजर

अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी मंगळवारी सकाळी लक्ष्मीनगर झोनमधील प्रभाग क्रमांक ३६ मधील हजेरी स्टँडची आकस्मिक पाहणी केली. यावेळी स्वच्छता निरीक्षक श्री. दिनकर गजभिये, स्वच्छता जमादार निसार शेख व सतीश मलिक हजेरी स्टँडवर हजर होते. या हजेरी स्टँडवर एकूण ४६ कामगार हजर होते. कोणतीही पूर्वसूचना न देता कामावर हजर नसलेल्या कामगारांची संख्या १० आढळून आली. या गैरहजर असलेल्या कामगारांवर १ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात तसेच रजेवर असलेल्या ७ कामगारांची रजा मंजूर झालेली आहे काय, याची शहानिशा करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी दिले.

# कळमेश्वर तालुका भाजपा ग्रामीण मंडळ विस्तारित कार्यकारिणी जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. १७ :

तालुका भाजपा ग्रामीण विस्तारित कार्यकारिणीची सभा निशा दत्त सभागृह कळमेश्वर येथे दि 16 जूनला पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी. भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. राजीव पोतदार होते. प्रमुख उपस्थितीमध्ये सावनेर कळमेश्वर विधानसभा क्षेत्राचे आमदार आशिष देशमुख, नागपूर जिल्हा भाजपा अध्यक्ष मनोहर कुंभारे, किशोर रेवतकर, ईमेश्वर यावलकर, रामराव मोवाडे, बापूसाहेब हळदे, अजय वाटकर, संदीप उपाध्याय, प्रकाश वरुळकर, प्रगती मंडल, माजी शहराध्यक्ष धनराज देवके, कळमेश्वर शहराध्यक्ष प्रतीक कोल्हे व अन्य मान्यवर उपस्थित होते.



सभेमध्ये उपस्थित मान्यवरांनी कळमेश्वर तालुका ग्रामीण मंडळाची विस्तारित कार्यकारिणी जाहीर केली त्यामध्ये महामंत्री मंगेश चोरे, स्वप्निल चौधरी, वैभव टेकाडे, उपाध्यक्ष विलास गणोरकर, गजानन वाडोदे, वैशाली ढगे, ज्ञानेश्वर काथवटे, महिला अध्यक्ष म्हणून बेबीताई धुर्वे, उज्वला पाल, मनीषा पिंपळशेंडे, अनुसूचित जाती अध्यक्ष मुकेश पराडे, ओबीसी अध्यक्ष मनोज मांडवगडे, किसान आघाडी अध्यक्ष अमोल भुरे, कळमेश्वर तालुका युवा मोर्चा अध्यक्ष अभिषेक धोटे आधीचा समावेश होता. या कार्यक्रमाला तालुक्यातून भारतीय जनता पक्षाचे मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## नागपूर शिक्षण उपसंचालक कार्यालयातील रिक्त पदे, थकीत पगार व अन्य प्रश्नांवर
# आमदार अडबाले यांची तातडीने कारवाईची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १७ :

नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी नागपूर येथील शिक्षण उपसंचालक (माध्यमिक) कार्यालयाला भेट देऊन विभागातील शिक्षक व शिक्षण सेवकांच्या विविध प्रलंबित समस्यांचा आढावा घेतला. यावेळी कार्यालयात पूर्णवेळ शिक्षण उपसंचालक नसल्याचे तसेच नगरपरिषद शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांचे मार्च २०२५ पासूनचे पगार थकीत असल्याचे निदर्शनास आले. यासह, पगार प्रक्रिया करणारा बाबूही नियुक्त नसल्याचे स्पष्ट झाले.

या पार्श्वभूमीवर आमदार अडबाले यांनी नागपूर विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात तातडीने पूर्णवेळ अधिकारी नेमण्याची मागणी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली. अन्यथा, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला. शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालय नागपूरला दिलेल्या भेटीदरम्यान, २३ जूनपासून शाळा सुरू करण्याबाबत विचारणा करण्यात आली. शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडून आदेश मिळाल्याशिवाय निर्णय शक्य नसल्याचे शिक्षण अधिकाऱ्यांनी सांगितले. यावर, सहा दिवसांची तरतूद करण्याची व शिक्षकांच्या ७६ सुट्ट्यांचे समायोजन पुढील सत्रात करण्याची सूचना त्यांनी केली आणि शिक्षण संचालनालयाकडे यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.



या भेटी दरम्यान, महाराष्ट्र विद्यालय, सिलेवाडा येथील पद्माकर राऊत यांना मुख्याध्यापक पदाचे मान्यता पत्र ऑन-द-स्पॉट देण्यात आले. पूर्णवेळ ग्रंथपालांच्या थकीत वेतन आणि रजा रोखीकरण बाबत देखील विशेष चर्चा झाली. शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडे यासाठी प्रस्ताव पाठवण्यात यावा, असे निर्देश देण्यात आले. माननीय शिक्षण आयुक्त पुणे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत ग्रंथपालांना दीर्घकालीन रजा मिळत नसल्याने रजा रोखीकरणाची मागणी पूर्ण झाली असून यासंबंधीचे पत्रकही निघाले आहे. त्यामुळे वेतन पथकाचे अधिक्षक गायकवाड यांना ग्रंथपालांचे रजा रोखीकरण त्वरित करण्याचे निर्देश देण्यात आले.

या वेळी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, प्रांतीय कोषाध्यक्ष भूषण तल्हार, विज्युक्टाचे महासचिव डॉ. अशोक गव्हाणकर, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महासंघाचे सहसचिव जगदीश जुनगरी, विमाशी नागपूर ग्रामीण अध्यक्ष अनिल गोतमारे, जिल्हा कार्यवाह संजय वारकर, कार्याध्यक्ष विजय गोमकर, कोषाध्यक्ष लक्ष्मीकांत व्होरा, वैभव चिमणकर, सुभाष गणवीर उपस्थित होते. विशेष सभा आयोजित करण्यात यावी, अशी सूचना आमदार अडबाले यांनी यावेळी केली.

## प्रभुनगर येथे हिंदु साम्राज्य दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

प्रभुनगर येथील भारतीय क्रीडांगण मैदानावर हिंदु साम्राज्य दिन साजरा करण्यात आला होता. यामध्ये मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते. श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा म्हणून हा दिवस साजरा करण्यात आला. शिरिष पाध्ये यांनी गीत सादर केले.

व्यासपीठावर महाराष्ट्र गडकिल्ले समितीचे सदस्य अतुल गुरु, सुशांत वाघ आणि भूपेश वंजारी उपस्थित होते. "राज्याभिषेक राजाचा होत असतो राज्याचा नाही" असे गौरवोद्गार अतुल गुरु यांनी काढले. कार्यक्रमात प्रभुनगर एरियामधून स्कूटर रॅली काढण्यात आली तसेच वयोगट ५ ते १५ मुला मुली करता चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा जोशी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रभूनगर वस्तीतील नागरिकांचे सहकार्य लाभले.

## अजनी लोको शेडकडून इंजिनांमध्ये लॉक झालेल्या चाकांच्या समस्येवर अभिनव पोर्टेबल ट्रॉलीचा विकास

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

कार्यप्रदर्शन कार्यक्षमतेच्या आणि नवोपक्रमाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील अजनी इलेक्ट्रिक लोको शेडने तीन-फेज इलेक्ट्रिक इंजिनांमध्ये एक्सल लॉक होण्याच्या घटनांवर उपाय म्हणून एक पोर्टेबल आणि संक्षिप्त ट्रॉली विकसित केली आहे. या नवकल्पनामुळे तातडीच्या प्रसंगी रुळांवरील अडथळे लवकर दूर करता येतील आणि विलंब लक्षणीय प्रमाणात कमी होईल.

ट्रॅक्शन मोटर, सस्पेन्शन किंवा ॲक्सल बॉक्स बेअरिंग्समध्ये बिघाड झाल्यास ॲक्सल लॉक होतो आणि संबंधित चाक अडकल्यामुळे संपूर्ण इंजिन थांबते, ज्यामुळे गाड्यांची वाहतूक अडथळीत होते. पारंपरिक पद्धतीने या समस्येचे निराकरण करण्यासाठी ब्रेकडाउन स्टाफ आणि जड यंत्रसामग्रीची आवश्यकता भासते, ज्यामुळे 2 ते 3 तास विलंब होतो.

या समस्येवर उपाय म्हणून अजनी लोको शेडने स्वदेशीपणे चार छोट्या चाकांनी सुसज्ज, हलकी आणि सहज जोडता येणारी ट्रॉली तयार केली आहे.



लिंक, साखळी आणि रेसिलिएंट ब्लॉकचा वापर करून ती अडकलेल्या चाकाच्या खाली बसवली जाते आणि ते चाक ट्रॅकपासून वर "फ्लोट" केले जाते, ज्यामुळे इंजिन स्वतःच्या शक्तीने जवळच्या लोको शेडपर्यंत नुकसान न करता जाऊ शकते.

ही ट्रॉली आता यांत्रिकी विभागाकडे सुपूर्द करण्यात आली असून ती अपघात निवारण गाडीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे, जेणेकरून तातडीच्या प्रसंगी ती तत्काळ वापरता येईल.

अजनी लोको शेडचा हा नवोन्मेष मध्य रेल्वेच्या कर्मचाऱ्यांची कौशल्य, सर्जनशीलता आणि कार्यनिष्ठा यांचे उत्कृष्ट उदाहरण आहे. या उपाययोजनांमुळे ना केवळ विलंब कमी होतो, तर सुरक्षित आणि सुरळीत रेल्वे वाहतूक सुनिश्चित होते. मध्य रेल्वे अशा स्वदेशी नवकल्पनांना नेहमीच प्रोत्साहन देत राहील, ज्यामुळे सुरक्षा, कार्यक्षमता आणि आत्मनिर्भरता वाढीस लागते.

## सुरक्षित रेल्वे सेवा सुनिश्चित करण्यासाठी सिंधी-बोरखडी विभागात सामरिक कटिंग काढण्याचे काम सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

पावसाळ्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि रेल्वे वाहतुकीस कोणतीही अडचण येऊ नये यासाठी, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने सिंधी- बोरखडी विभागातील कि.मी. 798/020-560 ते कि.मी. 803.00-804.00 दरम्यान महत्त्वपूर्ण कटिंग काढण्याचे काम केले आहे. या ठिकाणी पावसाळ्यात पाण्याची प्रचंड साठवण होते आणि जलनिकासीची अडचण निर्माण होते, ज्यामुळे ट्रॅकची स्थिरता धोक्यात येते.

कि.मी. 798/020-560 जवळील रोड ओव्हर ब्रिजच्या शेजारी खोल कटिंग असून पावसाचे पाणी येथे साचते, ज्यामुळे ट्रॅकची अवस्था खराब होते. तर कि.मी. 802.00-803.00 मधील काळी माती असलेल्या भागात साइड ड्रेन लवकर भरतात, त्यामुळे पाणी ट्रॅकवर वाहते. परिणामी, बॅलास्ट कुशनमध्ये चिखल निर्माण होतो, लोच कमी होते, जलनिकासी अकार्यक्षम होते आणि ट्रेन सेवेच्या सुरक्षिततेवर विपरीत परिणाम होतो.



या समस्येच्या निराकरणासाठी नागपूर विभागाने प्रगत यंत्रसामग्री जसे की खोदकाम करणारे यंत्र व बुलडोझर वापरून मोठ्या प्रमाणावर यांत्रिक उत्खनन करून कटिंग हटवण्याचे काम केले.

काढलेली माती व खडक तटबंध बांधण्यासाठी पुनर्वापरात आणली जात आहे किंवा ती वैज्ञानिक पद्धतीने ठराविक जागी टाकली जात आहे. याशिवाय, मातीचा झपाट्याने होणारा खच थांबवण्यासाठी आणि ट्रॅक तटबंधाची दीर्घकालीन मजबुती सुनिश्चित करण्यासाठी उतार स्थिरीकरणाचे उपायही राबवले जात आहेत.

या महत्त्वपूर्ण उपक्रमामुळे ट्रॅक स्थिरतेत वाढ, जलनिकासी कार्यक्षमता सुधारणा आणि पावसाळ्यातील संभाव्य अडथळ्यांपासून सुटका मिळणार आहे. ही कार्यवाही मध्य रेल्वेच्या सुरक्षित, सक्षम व हवामान प्रतिकारक्षम सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनाचे दर्शन घडवते.

मध्य रेल्वे नेहमीच नवोन्मेषी व प्रतिबंधात्मक देखभाल तंत्रांचा अवलंब करत असते. सिंधी-बोरखडी विभागातील ही कृती नागपूर विभागाच्या सुरक्षित आणि विश्वासार्ह रेल्वे सेवेच्या बांधिलकीचा पुढील टप्पा आहे.

## मृण्मयी कानेटकर यांना पीएच.डी.



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

मृण्मयी प्रशांत कानेटकर यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत विषय वाणिज्य विषयात डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएचडी) पदवी प्रदान केली आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या मार्गदर्शनात त्यांनी "इव्हॅल्यूशन ऑफ रिटेल इन्व्हेस्टर्स बिहेवियर टुवर्ड्स क्रिप्टो करन्सी विथ स्पेशन रेफरन्स टू नागपूर सिटी" या विषयावर प्रबंध सादर केला होता. त्यांनी सी.पी. अँड बेरार ई.एस. कॉलेज, तुळशीबाग, नागपूर येथून हे संशोधन केले आहे. यशाचे श्रेय त्यांनी मार्गदर्शक, संशोधन केंद्र, परिवाराला दिले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मानले आभार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :

रामगिरी बंगल्यावर ३ जून २०२५ रोजी महाराष्ट्र सरकार ने मंत्रिमंडळात महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना केली असा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. या निर्णयाचे स्वागत करत नागपूर मध्ये भारतीय जनता पार्टी अनुसूचित जमाती मोर्चा आणि सामाजिक संघटना व आदिवासी समाज बांधव यांच्या तर्फे नागपुरात गोंड राजे बख्त बुलंद शाह यांच्या प्रतिमेसमोर जल्लोष करण्यात आला होता. या निर्णयाने राज्यातील आदिवासी बांधव हे अत्यंत आनंदी असून त्यांचा शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक इतर समस्यांचे निराकरण या राज्य आयोगातर्फे होईल अशी आशा समाजाला आहे.

कारण आदिवासी समाजाचा वापर आजपर्यंत फक्त निवडणुका होत पर्यंत विविध पक्ष करायचे परंतु भाजपा सरकार ने २०१४ पासून मोदीजी यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र सरकार मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदिवासी बांधवांसाठी सतत त्यांचा हिताचे निर्णय घेतले आहे. खऱ्या अर्थाने आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास हा देवेंद्र फडणवीस यांनी केलेला आहे याची पोच पावती म्हणून राज्यातील अनेक लोकप्रतिनिधी, आदिवासी बांधव हे भाजपा सरकार च्या समर्थनार्थ आहेत. हा ऐतिहासिक निर्णय घेणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना



क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा यांची प्रतिमा भेट देवून १५ जुन २०२५ ला नागपुर येथील रामगिरी बंगल्यावर त्यांचे आभार मानले गेले. तेव्हा भाजपा अनुसूचित जमाती मोचार्चे महाराष्ट्र प्रदेश सचिव आकाश मडावी, नागपुर शहर महामंत्री रोहित कुमरे, सागर इवनाते, देव मरस्कोल्हे, श्याम कार्लेकर, ललित मडावी, स्वप्निल वलके, अश्विन गेडाम, अमित मरापे, राकेश गडपल्लीवर, मिलिंद कोवे, अक्षय मडावी, मयूर कोवे, निलेश धुर्वे, प्रतिक मडावी, अनिकेत कुमरे, आकाश उईके, मयूर मसराम, मनीष सयाम, सचिन चौधरी, दिपक कुमरे, निखिल आत्राम, गोलू गेडाम, मयूर पेंदाम, किशोर सेन, आशिष मसराम, जितेंद्र परतेकी आदींनी आभार मानले.

## शिवशक्ती सांस्कृतिक व क्रिडा मंडळातर्फे उन्हाळी शिबीराचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :

राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवरायांना दिलेले संस्कार घरोघरी पोहचावे आणि घराघरातून छत्रपती शिवाजी महाराज घडावे. हाच विचार पुढे ठेऊन संस्थापक वस्ताद हितेश यांनी २०१६ मध्ये शिवशक्ती आखाडा संघटना सुरु करण्यात आली. साधना, पर्यावरण, महिला, सशक्तीकरणं, सामाजिक बांधलीकी, उधोजकता, पुतळ्याचे संवर्धन आणि भारतीय युद्ध कला या ७ विषयावर ही संघटना गेल्या ७ वर्षा पासून कार्यरत आहे. १४ वर्ष झालीत हितेश या कार्यात सक्रिय आहेत. त्यांचा मूळ हेतू मुलं, मुली हे स्वतःकरीता आणि देशकरिता सक्षम झाले पाहिजे या करीता ते खूप मेहनत घेतात. मुलांना लाठी, काठी, तलवार, दानपट्टा, भाला, विटा व इतर शस्त्र याचं प्रशिक्षण देतात. त्यांचे बौद्धिक क्लास पण घेतात. भारतीय व्यायाम, रायफल शूटिंग, बऱ्याच गोष्टी शिकविल्या जातात. मुलांना ऑलिपिक साठी तयार करतात. व्येसन मुक्ती आणि महापुरुषांचे पुतळ्यांचे काळजी घेणं हे ध्येय, शिवशक्ती आखाडाच्या माध्यमातून जवळ-जवळ ५०० मुलं तयार केली आहेत.

उन्हाळी शिबीराचा समारोप ईश्वर देशमुख कॉलेज या ठिकाणी घेण्यात आला होता. सगळ्यांच गोष्टीचा अभ्यास या मुलांना देण्यात आला होता. या कार्यात सक्रिय कार्य करणारे हितेश डफ, प्रदीप मानकर, संकेत वरले, संकेत नांदे, अपर्णा कुळकर्णी, प्रणय गुल्हाकर, नितीन पिल्ले, ओम सोलाट, आकाश मांडवकर, अभिषेक रंगारी, सौरभ देवरकर, कार्यक्रम फार अप्रतिम झाला.

## कंडक्टरांवरील अन्यायकारक कारवाईविरोधात लाल बावटा वाहतूक कामगार युनियनचे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १७ :

"आपली बस" प्रकल्पात कार्यरत कंडक्टरांवर WT प्रकरणात कोणतीही चौकशी न करता, तसेच कारणे दाखवा नोटीस न देता थेट दंड आकारणे व नोकरीवरून कमी करणे ही अन्यायकारक पद्धत तात्काळ थांबवावी, अशी मागणी लाल बावटा वाहतूक कामगार युनियन (सीटू) तर्फे करण्यात आली.

युनियनच्या वतीने आज मनपा उपायुक्त वसुमना पंत यांना निवेदन देण्यात आले. यामध्ये नमूद करण्यात आले की, प्रवाशांकडून दंड न वसूल करता WT प्रकरणात केवळ कंडक्टरला दोषी धरून थेट 2000/- रुपये दंड व अनेक दिवस कामावरून कमी करण्याचे प्रकार सुरु आहेत. काही प्रकरणांमध्ये तर सहा-सहा महिन्यांसाठी कंडक्टरांना कामावरून कमी करण्यात आले



### आपली बसमधील SOP धोरणात बदलाची मागणी

आहे, जे कामगार कायद्याच्या सरळसरळ विरोधात आहे. या नियमांचे युनियनशी सल्लामसलत न करता अमलात आणणे अन्यायकारक असून, ते तातडीने सुधारण्यात यावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली. निवेदन देताना अनिस सिरकिया, प्रविण रंगारी, सचिन मुडे, सुनिल माकडे, विठ्ठल जुनघरे, दिलीप देशपांडे, योगेश रणदिवे, राजेश पोटुडे आदी युनियन पदाधिकारी उपस्थित होते. उपायुक्त वसुमना पंत यांनी याबाबत महापालिका आयुक्तांशी चर्चा करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# प्रवाशांना चांगल्या खानपान सुविधा देण्यासाठी गाड्यांच्या पॅन्ट्री कारमध्ये विशेष तपासणी मोहीम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

मेल/एक्सप्रेस गाड्यांमध्ये प्रवाशांना दर्जेदार खानपान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केटरिंग वस्तूंची गुणवत्ता आणि अन्नपदार्थांचा आणि ब्रँडेड सीलबंद पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचा विहित दराने पुरवठा, उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आणि सर्व उपलब्ध उपकरणांची स्थिती आणि देखभाल नियमितपणे तपासण्यासाठी, विभाग विशेष तपासणी मोहिमा राबवल्या जातात. या संदर्भात, १२ जून ते १८ जून २०२५ पर्यंत गाड्यांच्या पॅन्ट्री कारमध्ये सखोल तपासणी केली जात आहे.

या मोहिमेअंतर्गत, वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक दिलीप सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली व्यावसायिक निरीक्षक आणि पर्यवेक्षक तैनात करण्यात आले होते. नागपूर-गोंदिया-दुर्ग, दुर्ग-डोंगरगड, जबलपूर-नैनपूर इत्यादी रेल्वे विभागांमधून धावणाऱ्या/जाणाऱ्या एकूण २४ गाड्या संघाने नामांकित केल्या आहेत. रेल्वे गाड्यांच्या पॅन्ट्री कारची सखोल तपासणी मोहीम राबविली जात आहे. प्रवाशांना



चांगल्या खानपान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यासाठी रेल्वेचे कमर्शियल ऑफिसर आणि कमर्शियल इन्स्पेक्टर गाड्यांमध्ये फिरत आहेत आणि पेंट्री कारची तपासणी करत आहेत.

या दरम्यान पेंट्री कारमध्ये अन्नपदार्थ सुरक्षित ठेवणे, निर्धारित किंमतीपेक्षा जास्त शुल्क आकारू नये, स्वच्छता आणि मेनूसह दर चार्ट पेंट्री कारमधील स्मोक डिटेक्टर, अग्निशामक यंत्रे, विद्युत उपकरणे आणि इतर अग्निसुरक्षा उपकरणांचा आढावा घेणे समाविष्ट आहे. सखोल तपास आणि त्याची उपलब्धता देखील सुनिश्चित केली जात आहे. आज, १७ जून '२५ रोजी झालेल्या या तपासणी मोहिमेदरम्यान, गाड्यांमध्ये बेकायदेशीर अन्नपदार्थ आढळून आले.

प्रवाशांना विक्री करणाऱ्या बेकायदेशीर विक्रेत्यांवरही कारवाई केली जात आहे. ट्रेन क्रमांक १२१०१ मुंबई-एलटीटी मधील प्रवासी अन्नपदार्थ विकणाऱ्या ६ बेकायदेशीर विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली आणि त्यांच्याकडून ८१६० रुपये दंड वसूल करण्यात आला. १२९९४ पुरी-गांधीधाम एक्सप्रेसमधील ७ बेकायदेशीर विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली आणि दंड म्हणून १०,४३०/- रुपये वसूल करण्यात आले. पॅन्ट्री कारमध्ये हॉट केसेस, बॉयलर, बॉटल कूलर इत्यादी विविध केटरिंगशी संबंधित उपकरणे असतात. पाण्याची योग्य स्थिती तपासली जात आहे.

# मनपाच्या शाळांमध्ये ११४ डिजीटल क्लास रुम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :

मिशन नवचेतनाअंतर्गत नवे शैक्षणिक सत्र सुरू होण्याच्या पर्वावर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये ११४ डिजीटल क्लासरुम तयार करण्यात आल्या आहेत. या डिजीटल क्लास रुममध्ये इंटरॅक्टीव्ह पॅनेल आणि कॉम्प्युटर लॅब ची सुविधा आहे. त्यामुळे पहिली ते बारावी वर्गापर्यंतच्या मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना आता डिजीटल बोर्डच्या माध्यमातून शिक्षण मिळणार आहे.

मिशन नवचेतना अंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये डिजिटल क्लास रुम तयार करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी पुढाकार घेतला आहे. महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना नव्या तंत्रज्ञानासह शिक्षण मिळावे, हा यामागचा उद्देश आहे. स्मार्ट बोर्डच्या माध्यमातून विद्यार्थी आधुनिक पद्धतीने शिक्षणाचे धडे गिरविणार आहेत.

याबाबत पूर्वतयारी म्हणून नव्या शैक्षणिक सत्राच्या सुरूवातीला शाळेतील शिक्षकांना दोन दिवसीय स्मार्ट बोर्डचे प्रशिक्षण देण्याची सुरुवात मंगळवारी (ता.१७) अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी.,



यांच्या उपस्थितीमध्ये बजेरीयातील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी ईझलायब्ररीतील सभागृहात करण्यात आली. यावेळी मनपाच्या शिक्षणाधिकारी साधना सयाम, माहिती तंत्रज्ञान अधिकारी स्वप्नील लोखंडे, सहायक शिक्षणाधिकारी संजय दिघोरे, शाळा निरीक्षक प्रशांत टेभुर्णे, शिक्षण विभागाचे समन्वयक भारत गोसावी उपस्थित होते. मनपा शाळेतील विद्यार्थ्यांची प्रगती व्हावी, विद्यार्थी तंत्रज्ञानस्नेही व्हावे, तसेच शिक्षकांना तंत्रज्ञानाची ओळख व्हावी म्हणून मुंबईतील प्रशिक्षक डॉ. प्रभात तिवारी आणि राजू काळबांडे यांच्यामार्फत स्मार्ट बोर्डचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. दोन दिवसात एकूण चार टप्प्यात 200 शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

पहिल्या दिवशी 54 शिक्षकांना स्मार्ट बोर्डमधील हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर कसे, बोर्डमधील विविध कंटेट कसे हाताळायचे याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी प्रशिक्षकांनी स्मार्ट बोर्डमधील विविध टूल्स, नोटपॅड, देवनागरी व इंग्रजी भाषा, शालेय अभ्यासक्रमाबाबत शिक्षकांना प्रशिक्षित केले. यावेळी शिक्षकांनी विचारलेल्या विविध प्रश्नाचे समाधानकारक उत्तरे प्रशिक्षकांनी दिले.

**जाहिरनामा**

महसूल व वनविभाग
कोर्ट विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी
नागपूर शहर, यांचे कार्यालय
(आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका – नागपूर शहर, जिल्हा – नागपूर
Email ID : tahsildarngpcity@gmail.com
दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९७५
क.ली /प्रस्तु-२/तह. नाग (शहर)/कावि – २९३/२०२५
दिनांक : ०४/०६/२०२५

वाचा :- १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च. २०२५ नुसार २. मा.उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र .०३/ई-१अ.दि.१७/३/२०२५.३.मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५ ४. श्री. राजकुमार रामबहाल शर्मा, जय भोले नगर, मेहंदीबाग, पावर हाउस जवळ, नागपूर यांचा अर्ज दिनांक २९/०५/२०२५

ज्याअर्थी अर्जदार श्री. राजकुमार रामबहाल शर्मा, जय भोले नगर, मेहंदीबाग, पावर हाउस जवळ, नागपूर यांनी त्यांच्या स्वताच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू श्री. राजकुमार रामबहाल शर्मा यांचा जन्म दिनांक २०/०८/१९७० रोजी त्यांच्या राहते घरी जय भोले नगर, मेहदीबाग, पावर हाउस जवळ, नागपूर येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्मचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमुद केले आहे.

त्याअर्थी मी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मा बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्वतः जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करिता

# नरखेडच्या तहसीलदारांचा "महसूल जिहाद", रोहना उत्पनाचे मुख्य केंद्र

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. १७ :

नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यात संत्रा मोसंबी अनुदानात १६ कोटी रुपयांचा महाघोटाळा झाला. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे सागर दुधाने यांनी हे प्रकरण उचलून धरले असता जिल्हादंडाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी यांना तत्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले. परंतु उपविभागीय अधिकाऱ्यांनी तहसीलदारांना चौकशीचे आदेश देऊन "चोराला चौकीदार नेमले आहे" या प्रकरणाची चौकशी येण्याआधीच या घोटाळ्याचे गुपित उलगडले आहे. एखाद्याला जीव लाऊन घात करण्याला "जिहाद" संबोधल्या जाते. असाच काहीसा प्रकार नरखेड तहसीलदारांनी नरखेड तालुक्यातील रोहना या गावासोबत केला आहे.

रोहना शिवारातील ३७८ शेतकऱ्यांना ११९३०७६०/- (एक कोटी एकोनवीस लक्ष तीस हजार सातशे साठ रुपये) देण्याचा विक्रम नोंदवला. आपल्या गावात एवढ्या मोठ्या प्रमाणात पैसे मिळाल्याचा प्रचंड आनंद शेतकऱ्यांना झाला. परंतु यापैकी १७८ बोगस शेतकऱ्यांना ७८ लक्ष रुपये त्यातून ५०% वसुली झाल्यामुळे आनंदाची ओहोटी सुरू झाली. या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता आमचे प्रतिनिधी गावात गेले असता तिथे सुरू असलेले अघोषित रेती लिलाव प्रकरण समोर आले.





रोहना गावातील ज्या शेतकऱ्यांचे प्रमुख उत्पादन शेती आहे. या शिवारातील शेती बागायती आहे परंतु गावालगतच्या नदी बंधाऱ्यातील गेट चोरी जाऊनही प्रशासनाने त्यावर काहीच उपाययोजना केली नाही. यामुळे पाणी थांबवता न आल्याने रेती माफियांची दिवाळी सुरू झाली व तहसील प्रशासनाची मर्जी असलेले परिसरातील निवडक माफियांनी नदीत मोठ्या प्रमाणात खड्डे केले आहे. रोहना गावातील कोणाचा मृत्यू झाल्यास नदीमध्ये प्रथम जागा समतल करून विधी करण्याचा प्रसंग ओढवला आहे. उलट ज्या गावच्या हद्दीत नदी आहे तेथील ट्रॅक्टर मालकांना वाळू उपसा केल्यास तत्काळ कारवाई केल्या जाते. परंतु माफियांच्या ट्रॅक्टर ला महसूली सुरक्षा पुरवली जाते. अवैध वाळू उपसा झाल्याने तेथील पिण्याच्या पाण्यावर परिणाम झाला आहे, ज्या गाववासियांना २०१७ मध्ये १८० टीडीएस प्रमाणात पानी मिळायचे ते आता ५०० पेक्षा टीडीएस प्रमाणावर पोहोचले आहे. मानवी शरीराला ५०० टीडीएस पेक्षा जास्त प्रमाण पाणी पिल्यास मुतखडा, किडनीवर परिणाम होतो.

> प्रचंड प्रमाणात वाळूतस्करी सुरू आहे, आतापर्यंत १० वेळा तहसीलदार यांच्याकडे तक्रार केली परंतु त्यांच्याच आशीर्वादाने हे सर्व सुरू असल्याने कोणावरही कारवाई नाही.
>
> **जितेंद्र लोणे, शेतकरी रोहना**

> पिण्याच्या पाण्याची समस्या गावकऱ्यांच्या जीवनावर दूरगामी परिणाम करणारी आहे, लोकांच्या लक्षात येईपर्यंत उशीर झालेला असेल.
>
> **सचिन चौधरी, ग्रामस्थ रोहना**

> माज्या तालुक्यातील शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या तहसीलदार यांच्यासह तहसील कार्यालयातील ५ कर्मचाऱ्यांच्या संपत्तीची एसआयटी चौकशीची मागणी महसूल मंत्री यांच्याकडे करणार आहे.
>
> **सागर दुधाने, शेतकरी नेते**

# नगरधन सिलंबम स्पर्धेत शिवशंभु आखाड्याच्या टीमने १८ मेडलसह द्वितीय क्रमांक पटकावला

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. १७ :

शिवशंभु आखाड्याच्या खेळाडुंनी नगरधन सिलंबम चँपियनशिप स्पर्धेत सहभाग घेऊन १८ मेडल प्राप्त करुन द्वितीय क्रमांक पटकाविल्याने कन्हान परिसरातुन कौतुकाचा वर्षाव होत आहे. छत्रपती बहुउद्देशीय संस्था नगरधन , बेटी बचाओ बेटी पढाओ कराटे ग्रुप नगरधन आणि धोपटे मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने कोटेश्वर देवस्थान परिसर नगरधन येथे रविवार (दि.१५) जुन रोजी सिलंबम चँपियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्याचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल , प्रमुख अतिथि जि.प.नागपुर माजी सभापती वर्षा धोपटे, नगरधन ग्रामपंचायत सरपंच माया दमाहे, उपसरपंच राम धोपटे, महाराष्ट्र थाय बॉक्सींग असोसिएशन सेक्रेटरी अजय खेडगरकर, समाजसेवक नरेश धोपटे, इंडिया महिली गल्फ रेफ्री शुभांगी सहारे यांचा हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. या स्पर्धेत रामटेक आणि पारशिवनी तालुक्यातील एकुण ८ टीम ने



सहभाग घेतला होता. कन्हान परिसरातील शिवशंभु आखाड्याचा खेळाडुंनी कोच अनिकेत निमजे यांचा मार्गदर्शनात नगरधन सिलंबम स्पर्धेत सहभाग घेतला. भावेश मस्के (स्वर्ण पदक), त्रिशिका कारस्कर (स्वर्ण पदक), आनंदी मोहोड (रजत पदक), अंशू मेश्राम (स्वर्ण पदक), अंतरा धोटे (स्वर्ण पदक), वैदेही बडवाईक (स्वर्ण पदक), हर्षल कुंभलकर (रजत पदक), जानवी अंबिलडुके (रजत पदक) , ऋषित मांधरे (रजत पदक), आदित्य मांधरे (कांस्य मेडल), यश टेंभुर्णे (कांस्य पदक), शिवन्या बोरकर (स्वर्ण पदक), सांझ गुप्ता (स्वर्ण पदक), भाग्यश्री दोडके (स्वर्ण पदक), मान्यता मोठघरे (रजत पदक), ओम सावरकर (स्वर्ण पदक), गौरव मदन (स्वर्ण पदक), सावेरी वासनिक (रजत पदक) या खेळाडुंनी आपल्या कला, कौशल्यपुर्ण व विविध खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करुन एकुण १८ विविध पदक प्राप्त करीत स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावुन कन्हान शहराचे नाव रोशन केले. शिवशंभु आखाड्याचे कोच अनिकेत निमजे यांचा मार्गदर्शनात दररोज तरुण मुलांना, मुलींना विविध खेळाचे व्यवसायिक प्रशिक्षण दिले जाते. खुप कमी वेळात अनिकेत निमजे यांनी सर्व खेळाडुंना व्यवस्थित प्रक्षिक्षण देऊन तयार केले. त्यांचा प्रयत्नाने व खेळाडुंचा उत्कृष्ट प्रदर्शनाने शिवशंभु आखाड्याचा खेळाडुंनी शिर्डीत राज्यस्तरीय सिलंबम स्पर्धेत चार पदक आणि नगरधन सिलंबम स्पर्धेत अठरा पदक प्राप्त केल्याने परिसरातील नागरिकांन कडुन खेळाडुंवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# गाव तलावात मासोळ्या मरण पावल्यामुळे शहरात दुर्गंधीचे वातावरण

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. १७ :

भिवापूर शहराच्या हद्दीत येत असलेला गावतलावाचा नव्याने ठेका घेतलेला ठेकेदाराने तालावात असलेल्या कल्पी मच्छी नष्ट करण्यासाठी तलावातील पाणी इतरत्र वळविमुळे तलावातील मासोळ्या मरण पावून त्या सडल्याने परिसरात दोन दिवसापासून उग्र वास येत असल्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.



याबाबत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण राऊत यांना याबाबत विचारणा केली असता. त्यांनी याबाबत नगरपंचायत भिवापूर प्रशासनाला पत्र देवून त्यांना मरण पावलेल्या मासोळ्याची योग्य विल्हेवाट करण्याचे सांगण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी प्रतिनिधीशी बोलतांना त्यांनी दिली. प्राप्त माहीती नुसार सदर १० किमी परिसरात असलेला गावतलावाचा गेडाम नामक ठेकेदाराला तीन वर्षासाठी ठेक्याने दिले आहे.

सदर ठेकेदाराने या तलावात शिंगाड्याचे उत्पादन घेण्यासाठी तलावात असलेला पाणी इतरत्र वळविला. त्यामुळे तलावातील पाणी कमी झाल्यामुळे येथील मासोळ्या फडफडून मरण पावल्या व सडल्या त्यामुळे उग्र दुगंधी युक्त वास येत असल्यामुळे नागरीकांना चांगलाच त्रास जाणवत आहे.

तलावालगत राहणाऱ्या नागरीकांना तर या दुगंधींचा अधिकच त्रास सहन करावा लागत असल्याने नाकावर रुमाल बांधूनच रहावे लागण्याची वेळ आली आहे.

# ४९५२ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर :** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 4,952 वाहन चालकांवर कारवाई करून 3,95,150 रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये 4 प्रकरणात 4 आरोपींवर कारवाई करून 68,520 रुपयांचा माल जप्त केला.

# भारत-माल्टा मध्ये औद्योगिक व पर्यटन सहयोग

## एआयडीच्या पुढाकाराने द्विपक्षीय संधींच्या नव्या वाटा खुल्या

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १७ :

भारताच्या जागतिक भागीदारीला नवे बळ देत असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट (एआयडी), नागपूरतर्फे विदर्भात औद्योगिक व पर्यटन सहकार्याच्या नव्या वाटा खुल्या करण्यासाठी माल्टा प्रजासत्ताकाच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळासोबतच बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या विशेष बैठकीसाठी माल्टा प्रजासत्ताकातील आयओडीआरचे गव्हर्नर जनरल प्रो. डॉ. लेलो मारा, आयओडीआरचे डिप्लोमॅट व आंतरराष्ट्रीय सचिव इंजि. मासेलो पट्टी आणि प्रतिनिधी डॉ. अफझल मिथा यांनी उपस्थिती लावली. या कार्यक्रमाचे आयोजन एआयडीचे अध्यक्ष आशिष काळे व उपाध्यक्ष गिरधारी मंत्री यांच्या नेतृत्वाखाली




करण्यात आले. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून स्थापन झालेल्या एआयडीने विदर्भाला औद्योगिक विकास, गुंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय सहयोगासाठी एक महत्त्वाचे केंद्र बनवण्याचे ध्येय समोर ठेवले आहे. यावेळी पर्यावरणीय सेवा, संरक्षण उत्पादन, प्लास्टिक व पॅकेजिंग, अन्न प्रक्रिया आणि आयटी-बीपीएम क्षेत्रांतील विदर्भातील प्रगत उद्योगांचे सादरीकरण शिष्टमंडळासमोर करण्यात आले. विदर्भातील पर्यटन क्षेत्रातील प्रगतीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

विदर्भातील सहा व्याघ्र प्रकल्प, खिंडसी तलावातील साहस पर्यटन केंद्रे, समृद्धी महामार्ग व कार्गो रेल्वेची द्रुत वाहतूक सुविधा, लक्झरी रिसॉर्ट्स तसेच एमटीडीसीची गुंतवणूक यामुळे विदर्भ हा पर्यटनाचा उदयोन्मुख केंद्र म्हणून विकसित होत आहे. यासोबतच कृषी, ग्रामीण व सांस्कृतिक पर्यटनातही या भागाची मोठी क्षमता असल्याचे सांगण्यात आले.

या भेटीत इको-टुरिझम, सागरी व साहसी पर्यटन, रिसॉर्ट विकास, डिजिटल पर्यटन प्लॅटफॉर्म्स तसेच सांस्कृतिक व शैक्षणिक देवाणघेवाण यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये सहकार्याच्या व्यापक संधींचा आढावा घेण्यात आला. या संवादामुळे व्यापार, तंत्रज्ञान हस्तांतरण व परस्पर गुंतवणुकीसाठी नव्या वाटा खुल्या झाल्या असून त्यातून विदर्भात रोजगार निर्मिती व शाश्वत आर्थिक प्रगतीला गती मिळण्याची अपेक्षा आहे. या प्रसंगी माल्टाचे सॅबॅतिनी, मोल्टिसँटी सर्जिओ, एआयडीचे मानद सचिव डॉ. विजय कुमार शर्मा व कार्यकारी समिती सदस्यही उपस्थित होते.

# सामाजिक कार्यकर्ते प्रवीण ढोकणे यांच्या कार्याची दखल

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १७ :

जि. प.उच्च प्राथमिक शाळा कलंभा, तालुका काटोल च्या वतीने नुकतेच उन्हाळी बाल संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दहा दिवस चाललेल्या उपक्रमात वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा महाराज यांच्या जीवन चारित्र्यावर डॉक्टर कवी अनिल गवळी यांच्या व्याख्यानाचे आयोजन होते. या नियोजित कार्यक्रमाचा अध्यक्ष व त्याच्या शैक्षणिक सामाजिक कार्याची दखल घेत शाळेतील मुख्याध्यापक सन्माननीय घनश्याम भडांगे सर यांनी पाहुण्यांच्या साक्षीने शाल, श्रीफळ व मोमेंटो देऊन त्यांचा जाहीर सत्कार केला. या कार्यक्रमाला कलंभा ग्रामवासी, स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सरपंच, पोलीस पाटील, आजूबाजूच्या परिसरातील सन्माननीय नागरिक, स्थानिक शाळेच्या कटोले, गोंधनी शाळेचे ज्ञानेश्वर विरखेडे उपस्थित होते.

# आषाढी एकादशीला पंढरपूरसाठी नागपूर - मिरज चार विशेष रेल्वेगाड्या

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १७ :

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे होणाऱ्या वारी मेळ्यादरम्यान भाविकांची वाढणारी गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे नागपूर आणि मिरज दरम्यान चार विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

नागपूर - मिरज विशेष गाडी ४ आणि ५ जुलै २०२५ रोजी सकाळी ८.५० वाजता नागपूर स्थानकावरून प्रस्थान करेल व दुसऱ्या दिवशी सकाळी ११.५५ वाजता मिरज स्थानकावर पोहोचेल. मिरज - नागपूर विशेष गाडी ६ आणि ७ जुलै २०२५ रोजी दुपारी १२.२५ वाजता मिरज स्थानकावरून प्रस्थान करेल व दुसऱ्या दिवशी १२.५५ वाजता नागपूर स्थानकावर येईल. या गाडीला अजनी, वर्धा, पुलगाव, धामणगाव, चांदूर, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुडूवाडी, पंढरपूर, सांगोला,म्हसोबा डोंगरगाव, जत रोड, ढालगाव, कवठे महांकाळ, सलगर, अरग येथे थांबे देण्यात आले आहते. या गाडीला एकूण १८ डबे राहतील. यामध्ये १० शयनयान डबे, ४ सर्वसामान्य श्रेणी डबे, दोन वातानुकूलित तृतीय श्रेणी डबे व दोन गार्ड-कम-लगेज डबे राहतील.

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने मोठ्या प्रमाणात तिकीट तपासणी मोहीम राबवली आणि एकाच दिवसात विनातिकीट तसेच अनधिकृत प्रवास करणाऱ्यांकडून ८.३५ लाख वसूल केले. मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने ९ जून २०२५ रोजी त्यांच्या अखत्यारीतील २० गाड्यांमध्ये तिकीट तपासणी मोहीम राबवली. तिकीटरहित आणि अनियमित प्रवासाला आळा घालणे, महसूल वाढवणे आणि प्रवाशांमध्ये शिस्त वाढवणे या उद्देशाने ही कारवाई करण्यात आली. या मोहीमेत ८० तिकीट तपासणी कर्मचारी, १० रेल्वे संरक्षण दल कर्मचारी आणि २ व्यावसायिक निरीक्षक यांचा समावेश असलेल्या एका समर्पित पथकाने तपासणी केली. विभागातील व्यावसायिक अधिकाऱ्यांनी या मोहिमेचे सक्रियपणे निरीक्षण केले. त्यामुळे पद्धतशीर अंमलबजावणी आणि पारदर्शकता सुनिश्चित झाली. या एकाच दिवसाच्या प्रयत्नात पथकाला अनियमित किंवा तिकीटरहित प्रवासाची १,३५५ प्रकरणे आढळून आली. या उपक्रमामुळे एकूण ८,३५,७६० ची कमाई झाली.

# के. गणेश यांचे २२ जून रोजी मार्गदर्शन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १७ :

विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशन (व्हीएमए) तर्फे उद्योजकांसाठी "इंडियाज मोमेंट: हाऊ टू बिल्ड स्केलेबल, डिजिटल अँड डीसरप्टिव्ह बिजनेस" या विषयावर उद्योजक के. गणेश यांचे व्याख्यान शनिवार, २२ जून २०२५ रोजी सकाळी 10.30 वाजता कविकुलगुरू हॉल, पर्सिस्टंट सिस्टम्स लिमिटेड येथे आयोजित करण्यात आले आहे. प्रसिद्ध सीरियल उद्योजक, मास्टरिंग डिसर्पशनचे लेखक, इंडियन स्कूल ऑफ बिझनेस आणि आयआयएम बंगळुरू येथील ॲडजंक्ट फॅकल्टी आणि बिगबास्केट, ब्लूस्टोन, होमलेन, पोर्टिया मेडिकल सारख्या अग्रगण्य उपक्रमांचे प्रवर्तक के. गणेश यांच्याशी उद्योजकांना विशेष संवाद साधता येणार आहे. सुमित प्रीथ्यानी आणि वरुण अग्रवाल हे प्रकल्प संचालक असून सूत्रसंचालन युसूफ मास्टर करतील. या कार्यक्रमाला रोशन रिअल इस्टेट - कॉर्पोरेट रिअल इस्टेट कन्सल्टंट्स, ब्रेड्स एन बियाँड याचे सहकार्य लाभत आहे. याच दिवशी संध्याकाळी लक्ष्मीनगर येथील दि सेवन हॉटेल मध्ये स्टार्ट-अप शोकेस सेशन आयोजित करण्यात आले असून या कार्यक्रमात निवडलेल्या स्टार्ट-अप्सना श्री. के. गणेश यांच्या समोर त्यांचे पिच डेक्स सादर करण्याची संधी मिळणार आहे.

# प्रभू श्रीरामाची प्रतिमा भेट देऊन शेखर सावरबांधे यांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :

तेली समाजाचे नवनिर्वाचित अध्यक्ष शेखरभाऊ सावरबांधे यांना शाल, श्रीफळ व श्री प्रभू रामचंद्राची प्रतिमा देऊन शिवसेना माथाडी कामगार सेनेचे नागपुर शहर अध्यक्ष सिद्धू कोमजवार, आशिर्वाद नगर गार्डन क्लब चे अध्यक्ष वामन साळवे तसेच नवीन सुभेदार जेष्ठ नागरिक क्लब चे अध्यक्ष बबनराव यादव यांचे कडून स्वागत करण्यात आले.

शेखरभाऊ सावरबांधे हे चार वेळेस नगरसेवक राहीले असून त्यांनी नागपूर शहराचे उपमहापौर पद सुद्धा भुषविले होते.तेली समाजाचे अध्यक्षपदी प्रचंड मताधिक्याने निवडून आलेत.

या स्वागत कार्यक्रमाच्या वेळी आशिर्वाद नगर गार्डन क्लबचे कोषाध्यक्ष व इतर पदाधिकारी विजय कडु, अरुण पळसापुरे, दिगांबर पिंपळकर, प्रकाश काळबांडे, प्रल्हाद शेंडे, विलास ईटनकर, कृणाल कोमजवार इत्यादी उपस्थित होते.

# मौजा मांगली (जगताप ) गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. १७ :

नक्षी ग्राम पंचायत अंतर्गत येत असलेल्या मौजा मांगली (जगताप ) या गावाचे पुर्नवसन नांदिखेडा गोहली येथे करण्याच्या मागणी नक्षी ग्राम पंचायत सरपंच अनिकेत वराडे यांच्या नेतृत्वात आज १७ जून मंगळवारला दुपारी तीन वाजता तहसिलदार कल्याणकुमार डहाट भिवापूर यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे

मांगली जगताप हे गाव मरू नदीच्या काठावर असून या गावाच्या सभोवताल नाला आहे. पावसाळ्यात या नाल्याला पूर येवून हे पाणी घरात शिरत असून मोठ्या पुरात गाव वाहून जाण्याची भिंती नागरीकांना वाटत आहे. पावसाळ्यात येणाऱ्या पुरामुळे गावाचा संपर्क तुटतो. या गावातील नागरीकांची पुर्नवसन करण्याची २० वर्षापासून मागणी आहे. बऱ्याच वेळा या बाबत नागरीकांच्या उपस्थितीत अनेकदा निवेदन देण्यात आली.

नांदिखेडा गोहली येथे रिकाम्या असलेल्या शासकीय जागेवर पुर्नवसन करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली परंतू याबाबत ठोस कारवाई करण्यात आली नाही त्याच संबंधाने आज परत एकदा पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या गावाचे पुनर्वसन करण्याची गरज असल्याची बहुसंख्य नागरीकांची मागणी आहे.

यावेळी, सरपंच अनिकेत वराडे, माजी सरपंच देवराव जगताप, विवेक जगताप, नर्मदा खोब्रागडे, बालु तुरक, तुकाराम मोहड, शरद पाटील, आशिश चौधरी, योजना बन्सोड, शोभाबाई चव्हाण, संगिताताई मोहड, रुपाली राऊत यांच्यासह गावातील नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

# चौदामैल उडाणपुलामुळे वाहतूक कोंडीचा गंभीर प्रश्न

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १७ :

नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्ग आणि गोंडखैरी-सावनेर मार्गाच्या संगमावर असलेल्या चौदामैल टी पॉइंटवर उभारण्यात येत असलेल्या उडाणपुलामुळे सध्या वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. झेंडू कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीकडून उडाणपुलाचे काम संथगतीने सुरू असून, त्यामुळे वाहनचालक, नागरिक तसेच औद्योगिक क्षेत्रातील कामगार यांचे हाल सुरू आहेत.



चौदामैल टी पॉइंट हे अपघातप्रवण क्षेत्र म्हणून ओळखले जाते. नागरिकांच्या मागणीनंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने १.४ किमी लांबीच्या उडाणपुलास मंजुरी मिळाली. मात्र, पुलाचे काम अपेक्षित वेगाने न सुरू झाल्यामुळे वाहतुकीची कोंडी नित्याची झाली आहे.

सध्या संपूर्ण वाहतूक एकाच सर्व्हिस रोडवरून वळविण्यात आली असून, यामुळे रुग्णवाहिका, स्कूल व्हॅन आणि मोठ्या वाहनांच्या रांगा अडकून पडत आहेत. रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना वेळेवर हॉस्पिटलपर्यंत पोहोचण्यात अडथळे येत आहेत. औद्योगिक वसाहतीत काम करणाऱ्या मजुरांनाही जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

पावसाळा तोंडावर असताना नाल्याचे काम पूर्ण झाले असले तरी मुख्य उडाणपुलाचे काम अजूनही कासवगतीने सुरू आहे. झेंडू कन्स्ट्रक्शनकडे विदर्भातील अनेक पुलांची जबाबदारी असतानाही चौदामैलसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी ते कामाला प्राधान्य देत नसल्याचा आरोप होत आहे.

या भागात पेट्रोल पंप, वेअरहाऊस, गोडावून आणि अन्य औद्योगिक केंद्रे असल्यामुळे वाहतुकीचा ताण अधिक आहे. काही वाहने सर्रास सर्व्हिस रोडवरच उभी राहत असल्यामुळे छोट्या वाहनांची अडथळ्यांमध्ये कोंडी होते.

नागरिक, वाहनचालक आणि स्थानिक व्यापाऱ्यांची एकमुखी मागणी आहे की, उडाणपुलाचे काम तातडीने पूर्ण करून वाहतुकीला दिलासा द्यावा, जेणेकरून या परिसरातील दैनंदिन हाल संपुष्टात येतील.

# २.४७ लाखांच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १७ :

अज्ञात आरोपीने एका बंद घराचे कुलूप तोडून रोकड आणि दागिन्यांसह एकूण 2 लाख 47 हजार रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला. ही घटना वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी अरुण लक्ष्मण पाटील (58) रा. बिरसानगर, दिघोरीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. रविवारी रात्री 1 वाजताच्या सुमारास अरुण घराला कुलूप लावून कुटुंबासह वस्तीतच राहणाऱ्या सासऱ्याकडे गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख 7 हजार आणि सोन्याचे दागिने असा 2,47,000 रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला.

# अंबाझरी दहन घाटाकडे जाणारा पूल तयार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १७ :

नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी मंगळवारी (ता.१७) नाग नदीच्या संरक्षण भिंतीच्या कामासह अंबाझरी दहन घाटाकडे जाणाऱ्या नव्याने तयार करण्यात आलेल्या पुलाच्या कामाची पाहणी केली. पाहणीदरम्यान आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी कामासंदर्भात समाधान व्यक्त करीत उर्वरित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

पाहणीदरम्यान मनपाचे मुख्य अभियंता श्री.मनोज तालेवार, धरमपेठ झोनचे कार्यकारी अभियंता श्री. मनोज गद्रे, उपअभियंता प्रमोद मोखाडे, कनिष्ठ अभियंता श्री.किशोर माथुरकर, प्रफुलवेद इन्फ्राचे श्री.प्रफुल्ल देशमुख, श्री.चेतन पवार यांच्यासह मनपाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सर्वप्रथम अंबाझरी दहन घाटाकडे जाणाऱ्या पुलाच्या कामाची पाहणी केली.



अंबाझरी दहनघाटाकडे जाणारा पूल जीर्ण झाल्याने त्याला तोडून नव्याने पूल उभारण्यात आला आहे. २७ मीटर लांबीचा हा पूल पॉवर आर्च टेक्नॉलॉजीद्वारे तयार करण्यात आला आहे.विशेष म्हणजे, हा पूल सिंगल स्पॅनमध्ये बांधण्यात आला असल्याने नदीच्या पात्रात पुलाचे पिलर नाही. या पुलामुळे नाग नदीतील पात्रातील पाण्याचा प्रवाह अडणार नाही. याकरिता प्लास्टिकचे पाईप हाय डेन्सिटी पॉली इथलीन अर्थात एचडीपीई पाईपचा वापर करण्यात आला आहे. या अत्याधुनिक तंत्रज्ञानाला विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी व्हीएनआयटीद्वारे मान्यता प्राप्त असल्याची माहिती आयुक्तांपुढे सादर करण्यात आली. यावेळी आयुक्त डॉ. चौधरी यांनी पुलाच्या कामाचे समाधान व्यक्त केले. नंतर आयुक्त यांनी अंबाझरी घाटालगतच्या नाग नदीला लागून असणाऱ्या संरक्षण भिंतीच्या कामाची पाहणी केली. याठिकाणी मजबूत संरक्षक भिंत उभारली जात आहे. ही कामे शेवटच्या टप्प्यात असून, लवकरात लवकर ही सर्व कामे पूर्ण करण्याचे ही निर्देश आयुक्त डॉ. चौधरी यांनी यावेळी दिले. तसेच आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी नदी सफाईच्या कामाबद्दलही समाधान व्यक्त केले.

# एनएमआरडीएने नदीनाल्यांची 30 जूनपूर्वी सफाई करावी : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १७ :

मनपाद्वारे शहरातील नागनदी, पिवळी नदी व पोहरा नदीच्या सफाईचे काम जवळपास पूर्ण झाले आहे.परंतु शहरालगतच्या एनएमआरडीए क्षेत्रात या नदी/ नाल्याची साफसफाई हवी तशी झालेली नाही. ही कामे नागपूर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने (एनएमआरडीए) येत्या ३० जूनपूर्वी पूर्ण करावी,असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी दिले.



नागपूर शहरातील पावसाळापूर्व कामांचा आढावा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मनपा मुख्यालयात घेतला. यावेळी आमदार डॉ. नितीन राऊत, आमदार कृष्णा खोपडे, आमदार विकास ठाकरे, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी, अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, मुख्य अभियंता मनोज तालेवार, राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाचे जनार्दन भानुसे, उपायुक्त गणेश राठोड, राजेश भगत यांच्यासह सर्व झोनचे सहायक आयुक्त, सर्व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

बैठकीत सर्वप्रथम मनपाचे मुख्य अभियंता मनोज तालेवार यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे पावसाळापूर्व नाले व नदी सफाईच्या झालेल्या कामांची माहिती दिली. यात शहरातील नाग नदी, पिवळी नदी व पोहरा नदीच्या सफाईचे काम जवळपास पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले.

यावेळी नालेसफाई नंतरचे छायाचित्रांसह माहिती देण्यात आली. परंतु, नागपूर शहरालगतच्या एनएमआरडीए क्षेत्रात नाग नदी व पोहरा नदीचे पात्र आहे. शहरालगतच्या या नद्यांच्या सफाईचे कामे एनएमआरडीएने तातडीने करण्याची गरज असल्याचे पालकमंत्री यांनी यावेळी सांगितले.

यासंदर्भात एनएमआरडीएला सूचना देऊन ही कामे येत्या ३० जूनपूर्वी पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी आमदार डॉ. नितीन राऊत, आमदार कृष्णा खोपडे व आमदार विकास ठाकरे यांनी नद्यांच्या काठांवर अद्यापही गाळ साचलेला असल्याचे निदर्शनास आणून दिले. यावर पालकमंत्र्यांनी या सूचनेची दखल घेऊन तात्काळ हा मलबा उचलण्याच्या सूचना दिल्या. पावसाळापूर्व कामे करताना लोकप्रतिनिधींना माहिती द्यावी तसेच त्यांच्या सूचनांवर अंमलबजावणी करण्यासाठी सहायक आयुक्त व कार्यकारी अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांनी आमदारांसोबत झोननिहाय बैठक घेण्याचे नियोजन येत्या १० दिवसात करण्याचे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी आयुक्तांना यावेळी दिले.

नागपूर शहरातील प्रमुख रस्त्यांचे रिकार्पेटिंग करण्याचे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी दिले. नागपूर महानगरपालिकेने नासुप्रच्या अखत्यारितील रस्त्यांच्या डांबरीकरणाची कामे सुद्धा करावी, याकरिता शासनाकडून मनपाला निधी उपलब्ध करून देता येईल, याकरिता आवश्यक डीपीआर तयार करावा असे निर्देश दिले. शहराची पालक संस्था म्हणून शहरातील संपूर्ण रस्त्यांचे रिकार्पेटिंग करण्याची सूचना पालकमंत्री यांनी दिली.

पावसाळापूर्व कामे व्यवस्थित करून यावर्षी पावसाळ्यात लोकांना त्रास होणार नाही, याचीकाळजी घेण्याची जबाबदारी सर्वांची आहे. यासाठी अधिकारी, लोकप्रतिनिधींनी समन्वय राखून कामे केल्यास नागरिकांना या पावसाळ्यात अतिवृष्टीचा त्रास होणार नाही, असेही पालकमंत्री बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे शहरातील मानेवाडा- बेसा रस्त्यांच्या कामाचे सुरू असून हे काम पूर्ण करण्याचे निर्देशही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

# अज्ञात चोरटयांनी दुचाकी पळविली

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. १७ :

कन्हान शहरातील सचिन तेंदुलकर मार्केट तारसा रोड परिसरातुन अज्ञात चोरट्यांनी दुचाकी वाहन चोरुन नेल्याची घटना सीसीटीवी कैमरात कैद झाल्याने पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.



कुणाल मनोहर मेढूले (२५) रा. जवाहरनगर वार्ड नं.४ कन्हान हा रजिस्टार आफिस पारशिवनी येथे खाजगी काम करतो. कुणालने कामावर येण्या जाण्याकरिता अभिशेख गुप्ता रा. शिवनगर कन्हान यांचे कडून सन २०२३ मध्ये हिरो स्पेलन्डर प्रो. दुचाकी वाहन क्रमांक एम एच.४०.एयु.२८८९ ही ४०,००० रुपयात विकत घेतली होती.

सोमवार (दि.१६) जुन रोजी सकाळी १०:३० वाजता आपल्या दुचाकी वाहन क्रमांक एम एच.४०.एयु.२८८९ ने ऑफिस सचिन तेंदुलकर मार्केट तारसा रोड कन्हान येथे गेला व दुचाकी वाहन योगेश कम्प्युटर यांचे समोर साईड स्टॅन्ड वर उभी करुन ऑफिस चे आत गेला.

ऑफिसचे काम करून कुणाल दुपारी २:३० वाजता च्या दरम्यान पारशिवनी रजिस्टार आफिस येथे जाण्या करिता ऑफिसच्या बाहेर आला असता पाहिले तर त्याला त्याची दुचाकी वाहन दिसुन आली नाही. ऑफिसला लागलेले सी.सी.टि.व्ही फुटेज चेक केले असता त्याला एक अनोळखी इसम काळी टिशर्ट व काळा हाफ पॅन्ट घातलेला इसम दिसुन आला. अनोळखी इसम ऑफिस बाहेर ठेवलेली प्रत्येक दुचाकी वाहनाला त्यांचे जवळ असलेली चाँबी लावून पाहत होता व त्याच इसमाने कुणालची दुचाकी वाहन चोरुन पळून गेला. अज्ञात चोरट्यांनी कुणालाची दुचाकी वाहन क्रमांक एम एच.४०.एयु.२८८९ किंमत ३०,००० रुपए चोरुन नेल्याने पोलीसांनी कुणाल मेढूले यांच्या तक्रारी वरून अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस सीसीटीवी फुटेज च्या आधारे आरोपीचा शोध घेत असुन पुढील तपास करीत आहे.

# जागतिक योग दिनाचा दशकपूर्ती सोहळा शनिवारी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १७ :




जागतिक योग दिनानिमित्त नागपूर महानगरपालिका, जिल्हा प्रशासन नागपूर आणि केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी २१ जून रोजी सकाळी ६ वाजता धंतोली स्थित यशवंत स्टेडियम येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्री मा. नितीन गडकरी, राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांच्यासह इतर मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

भारतीय संस्कृतीचा वारसा असलेल्या योगाला जागतिक पातळीवर ओळख देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रसंघातर्फे जागतिक पातळीवर २१ जून जागतिक योग दिन घोषित करावा, यासाठी प्रयत्न केले होते. त्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघातर्फे दरवर्षी २१ जून जागतिक योग दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. जागतिक योग दिनाला यावर्षी १० वर्षे पूर्ण होत असून, या दशकपूर्तीनिमित्ताने मनपाद्वारे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग या संकल्पने आधारित कार्यकमात विशेष अतिथी म्हणून खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार अभिजीत वंजारी, सुधाकर आडबाले, डॉ. परिणय फुके, कृपाल तुमाने, संदीप जोशी, डॉ. नितीन राऊत, कृष्णा खोपडे,मोहन मते, विकास ठाकरे, समीर मेघे. डॉ. आशिष देशमुख,संजय मेश्राम यांच्यासह विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, रातुम नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधवी खोडे-चवरे, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, नागपूर स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा चांडक, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, दमक्षेसं केंद्राच्या संचालिका आस्था एम. कार्लेकर, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांच्यासह जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाचे प्रमुख रामभाऊ खांडवे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शासकीय आयुर्वेद महाविद्यालय सक्करदरा, जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळ, हौशी नागपूर योगासन असोसियेशन, वाय के. ग्रुप ऑफ इंस्टीट्युट, पतंजली, दत्ता मेघे आयुर्वेदिक कॉलेज हिंगणाचे आदी स्वयंसेवी संस्था सहकार्य करीत आहे. जागतिक योगदिनाच्या दशकपूर्तीनिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे व मनपाचे उपायुक्त विनोद जाधव यांनी केले आहे.

# एसआयटीने नोंदविले बोगस शिक्षकांचे बयाण

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १७ :

शालार्थ आयडी घोटाळ्याप्रकरणी एसआयटीच्या प्रमुख एसीपी सुनीता मेश्राम यांच्या पथकाने सात शिक्षकांचे बयाण नोंदविले आहेत. त्यांच्या बयाणावरून विठ्ठल-रुक्मिणी बहुउद्देशीय उच्च प्राथमिक शाळेच्या संस्थाचालकाला अटक करण्यात आली.

मोहपा येथे ही शाळा असून, सात शिक्षकांची 2013 मध्ये नियुक्ती झाली होती. मात्र, त्यांच्या शालार्थ आयडी 2022-23 मध्ये तयार करण्यात आल्या. विशेष म्हणजे शासकीय आणि नियमानुसार कुठलीच प्रक्रिया न करता डायरेक्ट आयडी बनविण्यात आल्या. त्यासाठी अप्रूव्हलदेखील घेण्यात आले नाही.

यानंतर त्या सर्व शिक्षकांचे समायोजन नागपुरातील (महाल)च्या एका शाळेत करण्यात आले. त्या सर्व शिक्षकांचे बयाण एसआयटीने नोंदविले. त्यांच्या बयाणात आर्थिक व्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले, अशी माहिती एसआयटीच्या प्रमुख एसीपी सुनीता मेश्राम यांनी दिली. एसआयटीने दिलेल्या माहितीनुसार, संस्थाचालक दिलीप धोटे याच्या निर्देशावरूनच शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. त्याला सोमवारी न्यायालयात हजर करण्यात येईल. या प्रकरणात एसआयटीला सखोल तपास करायचा असल्याने न्यायालयाला आणखी पोलिस कोठडीची विनंती करण्यात येईल.

त्यामुळे धोटे आणखी दोन दिवस पोलिस कोठडीत राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. पोलिसांनी चरण नारायण चेटुके (63) रा. गोंदिया या राजश्री शिक्षण संस्था आणि भंडारा येथील नवोदय शिक्षण संस्थेच्या संस्थाचालकाला अटक केली होती. याशिवाय एका संस्थाचालकाला चौकशीसाठी बोलाविले होते. शालार्थ आयडी प्रकरणात जवळपास 680 शिक्षकांच्या आयडी आतापर्यंत बोगस निघाल्या असल्याची माहिती आहे. त्यांची नियुक्ती करणाऱ्या संस्थाचालकांवर सायबर पोलिसांकडून गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यातूनच आतापर्यंत तिघांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जवळपास 40 हून अधिक संस्थाचालक सायबर पोलिसांच्या रडारवर असल्याची माहिती आहे.

# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वसतीगृह प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

**नागपूरः** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह, शासकीय निवासी शाळा चालविली जातात, मागासवर्गीयांची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नती तसेच त्यांचे राहणीमान, समाजातील इतर घटकांप्रमाणे त्यांना जीवन जगता यावे तसेच, त्यांना सर्व प्रकारचे शिक्षण व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने शासकीय वसतीगृह योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत शासकीय वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना निवासाची व भोजनाची मोफत व्यवस्था, इत्यादी सोयी सुविधा पुरविण्यात येत सामाजिक न्याय विभागांतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर या कार्यालयाच्या अधिनस्त नागपूर जिल्ह्यात शहरी भागात मागासवर्गीय मुलामुलींसाठी एकूण १४ वसतीगृहे तसेच तालुका स्तरावर मागासवर्गीय मुलामुलीसाठी एकूण ११ असे एकूण २५ शासकीय वसतीगृह नागपूर जिल्ह्यात कार्यान्वित आहेत.

# मोहपा शहराचा नव्याने सिटी सर्वे सरकारी खर्चाने होणार : आ.डॉ.आशिष देशमुख

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. १७ :

दि. 16 जूनला जिल्हा नियोजन भवन, नागपूर येथे नगर परिषद मोहपा येथील चुकीचा झालेल्या सिटी सर्वेबाबत महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांनी सावनेरचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या सतत पाठपुराव्यामुळे तात्काळ बैठक लावली होती. मोहपा नगर परिषदेचा सिटी सर्वे सन २०१७-१८ मध्ये तालुका भूमीअभिलेख कार्यालय कळमेश्वर यांच्याद्वारे झाला होता आणि तो 99 टक्के चुकीचा झाला होता. त्यामुळे मोहपा शहरातील बहुतांश संपूर्ण नागरिकांना अनेक समस्यांना समोरे जावे लागत आहे.



या महत्त्वाच्या विषयासाठी आमदार डॉ.आशिषराव देशमुख यांनी शासनदरबारी पाठपुरावा केला. त्यांनी पत्राद्वारे मोहपा शहरातील ज्या अनेक समस्या जसे की, वडिलोपार्जित असलेल्या जमीनीलासुद्धा खरेदी-विक्रीसाठी अडचण होत आहे, यामुळे संपूर्ण शहराला खूप त्रास होत आहे.

हे सर्व मुद्दे आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी शासनाकडे धरून लावले. त्याची दखल घेत आज महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांनी जिल्हा नियोजन भवन नागपूर येथे झालेल्या बैठकीमध्ये जुना संपूर्ण सिटी सर्वे रद्द करून नवीन सिटी सर्वे करावा, असा आदेश दिला. मुख्य म्हणजे, यासाठी लागणारा संपूर्ण खर्च डीपीडीसी मधून होणार आहे.

महत्वाचे म्हणजे सर्व लाभार्थ्यांना मोफत सनद वाटप करण्यात येणार असून यामध्ये लाभार्थ्यांना कोणताही खर्च करण्याची गरज पडणार नाही. ही सर्व कार्यवाही 3 दिवसांमध्ये पूर्ण करावी, असे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना बावनकुळे साहेबांनी दिले.

विशेष म्हणजे, आमदार डॉ आशिषराव देशमुख यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना यासंबंधी 02 जूनला सुद्धा एक निवेदन दिले होते. सतत पाठपुरावा केल्यामुळे त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याचे सर्वत्र बोलले जात आहे.

# मनपातर्फे स्टॉप डायरिया कॅम्पेनला सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. १७ :

नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयातील अतिरिक्त आयुक्तांच्या सभा कक्षामध्ये सोमवारी (ता. १६) टास्क फोर्सची बैठक मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या अध्यक्षतेत पार पडली. यावेळी शहरातील आरोग्य आणि लसीकरणविषयी व स्टॉप डायरिया कॅम्पेन विषयी माहिती त्यांनी जाणून घेतली. यावेळी त्यांनी बालकांच्या लसीकरणावर भर देत व दूषित पाणी असलेल्या भागांमध्ये लक्ष देण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.



बैठकीत मनपाच्या प्रजानन व बालकल्याण अधिकारी डॉ. सरला लाड, मुख्य स्वच्छता अधिकारी गजेंद्र महल्ले, झोनल वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शीतल वंदिले, डॉ. सुलभा शेंडे, डॉ. जयश्री चन्ने, डॉ. वर्षा देवस्थळे, डॉ. ख्वाजा मोईनुद्दीन, डॉ. सुनील कांबळे, डॉ. विजयकुमार तिवारी, डॉ. दीपांकर भिवगडे, डॉ. गजानन पवाने, डॉ. अतीक खान, पीएचएन अर्चना खाडे, लायन्स क्लबचे बलबीर सिंग विज यांच्यासह लसीकरण क्षेत्र सनियंत्रक व प्रतिनिधी प्रामुख्याने उपस्थित होते.

बैठकीत सर्वप्रथम प्रजानन व बालकल्याण अधिकारी डॉ सरला लाड यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे झोननिहाय करण्यात आलेल्या नियमित लसीकरणाची स्थिती मांडली. नवजात बालकांपासून ते गरोदर मातांना विविध प्रकारचे लसीकरण केले जात असल्याचे सांगत या लसींपासून कुणीही माता आणि बालक वंचित राहू नये यावर भर देण्यात आला. जास्तीत जास्त ठिकाणी जाऊन वंचित बालकांचे लसीकरण करण्याची गती वाढविणे असे निर्देश वसुमना पंत यांनी यावेळी दिले.

यानंतर स्टॉप डायरिया कॅम्पेन विषयी चर्चा करण्यात आली. ही मोहीम ०२ जून २०२५ ते ३१ जुलै २०२५ या दरम्यान राबविण्यात येत आहे. त्यानुसार १६ जून पासून हा कार्यक्रम लागू करण्यात आला आहे. अतिसारामुळे होणारे बालमृत्यू शून्यावर आणणे हे या मोहिमेचे ध्येय आहे.

अतिसारावर करा मात, स्वच्छता आणि ओआरएसची घेऊनी साथ हे या मोहिमेचे घोषवाक्य आहे. या मोहिमेदरम्यान मनपाच्या आरोग्य विभागातर्फे झोननिहाय ठिकठिकाणी जाऊन ओआरएस आणि झिंक चे वाटप करण्यात येत आहे. तसेच झोपडपट्टया,वीटभट्टी व पूरग्रस्त भागात जाऊन दुर्बल घटकांवर विशेष लक्ष देण्यात येत आहे. पाच वर्षांखालील मुलांच्या अतिसार प्रतिबंध आणि व्यस्थापनेसाठी पालकांचे समुपदेशन करण्यात येत आहे.

# प्रयोगशाळा प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रवेश परीक्षा २२ जून रोजी

■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. १७ :

प्रा. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरीतर्फे विज्ञानप्रेमी विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अतिरिक्त बॅचसाठीची प्रवेश परीक्षा 22 जून रोजी आयोजित करण्यात आली आहे.

इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या या परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी जुलै 2025 पासून वर्षभर चालणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी पात्र ठरतील. या कार्यक्रमात केवळ 15 विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. यात विद्यार्थ्यांना जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, गणित आदीचे प्रयोग शिकण्याची संधी मिळणार आहे. या परीक्षेसाठी 20 जून पर्यंत नोंदणी करायची आहे.

अधिक माहितीसाठी अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी व पालकांनी प्रा. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरी, २ रा मजला, तारकुंडे धरमपेठ हायस्कूल, शंकरनगर मेट्रो स्टेशनजवळ, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर येथे संपर्क साधावा.

# शस्त्रासह एकाला अटक

**नागपूर :** गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने गस्तीदरम्यान एका गुंडाला शस्त्रासह पकडले. वसीम उर्फ बब्बर रफीक पठाण (35) रा. मीठा निम दर्गा परिसर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. रविवारी सायंकाळी गुन्हे शाखेचे पथक गिट्टीखदान ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान बेरिवाले बाबा दर्गाजवळ एक व्यक्ती शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिस परिसरात पोहोचले. पोलिसांना पाहताच वसीमने तेथून पळ काढला. पोलिसांनी घेराव टाकून त्याला पकडले.

# संपादक, पत्रकारांसह विद्यार्थ्यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी,
कामठी, दि. १७ :

८ जून २०२५ रोजी तेजस बहुउद्देशीय संस्थाच्या वतीने राम जानकी मंगल कार्यालयात वृत्तपत्रांचे संपादक, पत्रकार आणि तेजस संस्था परिवार २०२५ परीक्षेत 10 वी 12 वी मधे उत्तीर्ण झालेले विद्यार्थी, समाजातील सामाजिक योद्धयांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता.



श्रीकृष्ण चांडक, प्रसिद्ध लोकगायक रजनी रजक, प्रल्हाद रजक, महेंद्र भुटानी, विनोद बुंदेले, दैनिक पुलगाव टाईम्सचे मुख्य संपादक अनूपकुमार भार्गव, दैनिक व साप्ताहिक पेपरचे मुख्य संपादक सुभाष राऊत (गुरुजी), दैनिक दोपहर सन्देशच्य मिलिंद पवनिपगार , साप्ताहिक विदर्भ गोल्डन न्यूज पेपरचे मुख्य संपादक एम. ए. जब्बार दैनिक देशोन्नती पेपरचे पत्रकार सुनील तिजारे, दैनिक राष्ट्रप्रकाश पेपरचे दराजेंद्र अतकरे, दैनिक महासागरचे सुरेश आढाऊ गुरुजी, साप्ताहिक आनंद भारतीच्या शीतल भगत, पत्रकार महादेव सिरसाठ, डब्ल्यूएच न्यूज या यूट्यूब चॅनलचे विजय खवसे, आईबीएन न्यूजचे भीमराव लोणारे, इंडिया फॅक्ट न्यूजचे नावेद आजमी, पत्रकार नितीन रावेकर, पत्रकार अब्दुल शेख, पत्रकार सुरेंद्रसिंग नागी, पत्रकार रोशन वानखडे, उदगार न्यूजचे नितीन वाघमारे आणि तेजस संस्थेचे विविध राज्य आणि जिल्ह्यातील सामाजिक योद्धे, भोपाळ येथील कपूरसिंग मालवीय, सौरभ राजक, देवास जगदीश जलोदिया इटारसी राजकुमार मालवीय, इंदौर शिवनारायण कोदीया, जबलपुर ओंकार रजक, विजय रजक, सागर संतोष रजक, बैतुलचे प्रल्हाद रजक, रामप्रसाद बाथरे, मनीष पाटणे, सुधाकर निंभूळकर पांढुर्णा, रामराव काळबांडे, मुलताई येथील श्याम सेवतकर, पारसिया येथील कमलेश माळवी, कडमेश्वर येथील सचिन सिरपूरकर, नागपूर येथील जगन्नाथ फाळे, सुनील ढोले, रितेश पात्रीकर, विजय सौदागर, वीरेंद्रकुमार काडीखाये आणि २०२५ मध्ये १० वी १२ वी उत्तीर्ण झालेले तेजस संस्था कुटुंबातील ३० विद्यार्थी आणि लहानपणापासून गाडगेबाबांचा पोशाख परिधान करून धोबी समाजाला गाडगेबाबांच्या कलाकृतींनी प्रेरित करणारा ईश कडीखाये यांना गाडगेबाबा सन्मानाने सन्मानित करण्यात आले.

तेजस बहुउद्देशीय संस्था राष्ट्रसंत गाडगेबाबा सेवा संघर्ष संघाची कामे जनतेपर्यंत सेवेच्या भावनेने पोहोचवण्याची जबाबदारीही समाजातील सामाजिक योद्धयांना देण्यात आली. पुलगाव समाचार पेपर चे संपादक अनुभव तर्फे वा नुलतही पांडूंना धोबी समाज तर्फे अलगुलेवारच्या सत्कार करण्यात आला समाचार पेपर अरगुलेवार यांनी त्यांच्या प्रास्ताविकात हे भारत सरकारच्या कानावर घातले.

त्यांनी गाडगे बाबांना भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यावर आणि संपूर्ण भारतातील धोबींना एकत्र करून ऑक्टोबर २०२५ मध्ये दिल्लीतील रामलीला मैदानावर मोर्चा काढण्यावर भर दिला.

त्यांनी छत्तीसगड सरकारमधील रजककार मंडळाचे अध्यक्ष प्रल्हाद रजक आणि लोकगायिका रजनी रजक यांना गाडगेबाबाला भारत रत्नचि चळवळीत सामील होण्याची विनंती केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार, उपाध्यक्ष देविदास पेटारे, सचिव किसन अरगुलेवार, मार्गदर्शक जगन्नाथ फाले, सदस्य इंदिरा अरगुलेवार, अभय पेटारे, तेजस अरगुलेवार , देव पेटारे, अभिनव सहारे, अक्षद मेश्राम, अरमान जकी अरशद जमाल यांनी अथक परिश्रम घेतले, मंच संचालन तानिया अरगुलेवार यांनी केले, आभार वीरेंद्रकुमार काडीखाये यांनी मानले.

# जानकीनगर भूमिगत वाहिनीत बिघाड

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १७ :

रविवारी रात्री नागपुरातील जानकीनगर, अवधुतनगर आणि शिवशक्तीनगर परिसरातील सुमारे 9 हजार ग्राहकांना विजेअभावी रात्र अंधारात काढावी लागली. मानेवाडा चौकात 11 केव्ही जानकीनगर वीज वाहिनीच्या भूमिगत केबल जॉईंटमध्ये झालेल्या बिघाडामुळे ही परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, या बिकट परिस्थितीत महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी रात्रभर न थकता काम केले आणि ग्राहकांना दिलासा देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.



रविवारी रात्री 9.30 च्या सुमारास जानकीनगर वीज वाहिनीमध्ये अचानक बिघाड झाल्याने परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला. भूमिगत वाहिनी असल्याने नेमका बिघाड कुठे झाला, हे शोधणे कर्मचाऱ्यांसाठी एक मोठे आव्हान होते. रात्रभर महावितरणचे कर्मचारी बिघाडाचे ठिकाण शोधण्यासाठी झटत होते. अथक प्रयत्नांनंतर त्यांना मानेवाडा चौकातील केबल जॉईंट वितळल्याचे आढळून आले.

या वाहिनीवर विजेचा भार मोठ्या प्रमाणात असल्याने तात्काळ बॅकफीड करून वीजपुरवठा सुरू करण्याचे प्रयत्नही निष्फळ ठरले. रात्रभरच्या अथक परिश्रमानंतरही तात्पुरता वीजपुरवठा सुरू करणे शक्य झाले नाही. अखेर, सकाळी 9 वाजेपर्यंत कर्मचाऱ्यांनी दुसऱ्या वाहिनीवरून वीज जोडून तात्पुरता पुरवठा सुरू केला, ज्यामुळे परिसरातील नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला.

सोमवारी सकाळी महावितरणच्या महाल विभागाचे कार्यकारी अभियंता समीर टेकाडे यांच्या नेतृत्वाखालील अभियंते आणि कर्मचाऱ्यांनी बिघाड दुरुस्त करण्याचे काम पुन्हा सुरू केले. दिवसभर अथक परिश्रम करून, अनेक तांत्रिक अडचणींवर मात करत त्यांनी रात्री उशिरा बिघाड पूर्णपणे दुरुस्त करता आला नाही. मानेवाडा चौकात भुमिगत केबल दुरुस्तीचे काम अद्याप सुरू आहे यासाठी जमिनिपासून तब्बल 8 फुट खोल आणि 8 फुट लांब व 3 फुट रुंद खड्डा खोदून केबल जॉईंट तपासल्या जात असून एक ज्वाईंट झाल्यानंतर पुढिल ज्वाईंट परत तसाच खड्डा खोदून तपासावा लागत असल्याने दुरुस्तीसाठी आणखी तीन ते चार तास वेळ लागण्याची शक्यता आहे.